मंगळवार, २ जुलै २०२४
⊙ किंमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
⊙ मराठी ⊙ दैनिक
⊙ वर्ष - ०३ ⊙ अंक - २९७
⊙ आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

# आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

●MARATHI ●DAINIK ●CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) TUESDAY 2 JULY 2024 | adhunikkesari.com | ●YEAR-03 ●ISSUE-297 ●RNI : MAHMAR/2021/82566 ●PAGE-12 ●PRICE-05

# नरेंद्र मोदी संपूर्ण हिंदू समाज नाहीत

## राहुल गांधी : संसदेत गदारोळ



आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली : नरेंद्र मोदी संपूर्ण हिंदू समाज नाहीत. भाजप हा संपूर्ण हिंदू समाज नाही. आरएसएस हा संपूर्ण हिंदू समाज नाही. हा भाजपचा ठेका नाही. स्वत:ला हिंदू म्हणवून घेणारे 24 तास हिंसा करतात, असे म्हणत पहिल्याच भाषणात संसदेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासह भाजप व आरएसएसवर हल्लाबोल केला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी उभे राहूल गांधी यांचा निषेध केला तर अमित शहा यांनी माफी मागावी, अशी मागणी केली. यामुळे संसदेत प्रचंड गदारोळ उडाला.**


काँग्रेस खासदार राहुल गांधी यांनी सोमवारी लोकसभेतील विरोधी पक्षनेते म्हणून पहिले भाषण केले. भगवान शिव आणि गुरु नानक यांचे फोटो दाखवून राहुल यांनी संसदेत भाषणाला सुरुवात केली. राहुल काही बोलण्यापूर्वीच लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांनी त्यांना अडवले. बिर्ला म्हणाले की, तुमचे सदस्य नियम 353 बद्दल सांगत होते. सभागृहाने नियम आणि कार्यपद्धती पाळली पाहिजे, असे तुम्ही म्हणाला होता. नियमानुसार सभागृहात कोणतेही फोटो किंवा फलक दाखवू नयेत.

यावर राहुल म्हणाले की, सदनात भगवान शिवाचा फोटो दाखवण्यास मनाई आहे का? इतर गोष्टींचे फोटो इथे दाखवता येतील, पण भगवान शंकराचे चित्र दाखवता येत नाही. त्यांच्याकडून आम्हाला संरक्षण मिळाले असे मी म्हणत असेल, संरक्षण कसे मिळाले हे सांगण्याचा प्रयत्न करत असेल, तर मला फोटो दाखवू दिला जात नाही. यानंतर माझ्याकडे आणखी फोटो आहेत. मला सर्व काही दाखवायचे होते. अध्यक्ष महोदय, हे फोटो संपूर्ण भारताच्या हृदयात आहेत. संपूर्ण भारताला हे माहिती आहे आणि समजले आहे.

सर मला माईक द्या. त्यांनी विचारले माईकचा ताबा कोणाकडे आहे साहेब? यावर अध्यक्ष ओम बिर्ला म्हणाले की, सभागृहात एक व्यवस्था आहे. जेव्हा एखाद्या व्यक्तीला आसनाच्या वतीने बोलण्यास सांगितले जाते तेव्हा त्याचा मायक्रोफोन चालू केला जातो. तुमचा माइक बंद नाही. माझ्या भाषणाच्या मध्येच माईक बंद होतो, मी काय करू : **राहुल गांधी**

लोकशाहीने मला शिकवले आहे की विरोधी पक्षाच्या नेत्याकडे गांभीर्याने पाहिले पाहिजे : **पंतप्रधान नरेंद्र मोदी**

**राहुल गांधींनी माफी मागितली पाहिजे** : राहुल गांधींनी लोकसभेत हिंदूंचा अपमान केला आहे. सगळे हिंदू हिंसा करतात हे वक्तव्य त्यांनी केले.



या वक्तव्याचा आम्ही तीव्र निषेध करतो. सगळ्या हिंदू समुदायाला हिंसक म्हणणं हा संपूर्ण हिंदू समाजाचा अपमान आहे. राहुल गांधींनी हे त्यांचे वक्तव्य मागे घेतलं पाहिजे. लोकसभेत त्यांनी सगळ्या हिंदू समाजाची माफी त्यांनी मागितली पाहिजे अशी मागणी देवेंद्र फडणवीस यांनी केली आहे. राहुल गांधींचे विधान आक्षेपार्ह आणि चुकीचे आहे. संपूर्ण हिंदू समाजाचा अपमान त्यांनी केला आहे. लोकसभेत त्यांनी हिंदू समाजाला हिंसक म्हणणे हा अपमान आहे. राहुल गांधींनी जाहीर माफी मागितली पाहिजे, असेही देवेंद्र फडणवीस म्हणाले.

# मेधा पाटकर यांना कारावास

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** २४ वर्षे जुन्या खटल्यात सामाजिक कार्यकर्त्या आणि नर्मदा बचाव आंदोनलाच्या संस्थापक मेधा पाटकर यांना दिल्लीतल्या साकेत न्यायालयाने पाच महिन्यांच्या कारावासाची शिक्षा सुनावली आहे. या प्रकरणी दिल्लीचे नायब राज्यपाल व्हि. के. सक्सेना यांना दहा लाख रुपये नुकसान भरपाई देण्याचे आदेशही न्यायालयाने पाटकर यांना दिले आहेत. दिल्लीचे सध्याचे नायब राज्यपाल व्ही. के. सक्सेना यांनी मेधा पाटकर यांच्या विरोधात याचिका दाखल केली होती. मेधा पाटकर आणि व्ही. के. सक्सेना यांच्यात हा वाद मागच्या २४ वर्षांपासून सुरू आहे. २४ मे रोजी मेधा पाटकर यांना साकेत न्यायालयाने दोषी ठरवले होते. व्ही. के. सक्सेना हे अहमदाबादच्या नॅशन कौन्सिल फॉर सिव्हिल लिबर्टीज या स्वयंसेवी संस्थेचे अध्यक्ष असताना त्यांनी मेधा पाटकर आणि त्यांच्या नर्मदा बचाव आंदोलनाच्या विरोधात एक जाहिरात प्रसिद्ध केली होती. ही संस्था सरदार सरोवराच्या बाजूने होती. ज्यानंतर मेधा पाटकर यांनी सक्सेना यांच्याविरोधात खटला दाखल केला होता. तर सक्सेना यांनी यानंतर मेधा पाटकर यांच्याविरोधात अब्रू नुकसानीचा दावा केला होता. ज्या प्रकरणाचा निकाल २४ मे रोजी लागला आणि मेधा पाटकर यांना दोषी ठरवण्यात आले. तक्रारदाराच्या प्रतिष्ठेला धक्का बसू शकतो याची जाणीव असूनही मेधा पाटकर यांनी जाहीररित्या आरोप केल्याचं स्पष्ट झालं असं साकेत न्यायालयाने म्हटलं आहे. तसंच मेधा पाटकर यांची कृती चुकीच्या हेतूने प्रेरित होती असेही म्हटले आहे. पाटकर यांनी सक्सेना यांना देशभक्त नसलेला माणूस म्हटले होते.

# सातबारा कोरा करा, अन्यथा मंत्र्यांना गावबंदी करू


आधुनिक केसरी न्यूज

**वाशिम :** हरित क्रांतीच्या माध्यमातून देशाला अन्नधान्यात समृद्ध करणाऱ्या दिवंगत वसंतराव नाईक यांच्याच राज्यात शेतकऱ्यांच्या सर्वाधिक आत्महत्या होणं हे देशासाठी लांच्छनास्पद आहे. सरकारच्या धोरणामुळे आज



शेतकऱ्यांवर कर्जबाजारी होण्याची वेळ आलीये. म्हणून सरकारने शेतकऱ्यांचा सातबारा कोरा करावा, अशी मागणी राजू शेट्टी यांनी केली असून यासाठी त्यांनी वाशिम जिल्ह्यातून दिवंगत वसंतराव नाईक यांच्या नावाने कर्जमुक्ती आंदोलनाची घोषणा केलीये. या आंदोलना अंतर्गत पहिल्या टप्प्यात सर्व शेतकऱ्यांचे निवेदन घेऊन राष्ट्रपतींना दिले जाणार आहेत. तर दुसऱ्या टप्प्यांमध्ये मंत्र्यांना गावबंदी केली जाईल, असेही राजू शेट्टी यावेळी म्हणाले आहेत. दिवंगत वसंतराव नाईक यांनी महाराष्ट्रामध्ये हरितक्रांती करून महाराष्ट्राला कृषीप्रधान राज्य बनवले. मात्र त्याच देशामध्ये सर्वाधिक शेतकऱ्यांच्या आत्महत्या होत आहेत, हे लांछनास्पद आहे. महिन्याला जवळपास 240 शेतकरी आत्महत्या करत आहेत. सरकारच्या चुकीच्या धोरणामुळे शेतकऱ्यांच्या डोक्यावर मोठं कर्ज आहे. म्हणून या कर्जाची जबाबदारी सरकारने घ्यावी आणि शेतकऱ्यांचा सातबारा कोरा करावा. यासाठी स्वर्गीय वसंतराव नाईक शेतकरी कर्जमुक्ती आंदोलनाची सुरुवात आज पासून सुरू केल्याची घोषणाही राजू शेट्टी यांनी केली आहे. पहिल्या टप्प्यामध्ये आम्ही राष्ट्रपतींच्या नावे प्रत्येक शेतकऱ्याचे एक निवेदन संकलित करणार आहोत. तर दुसऱ्या टप्प्यामध्ये केंद्र आणि राज्य सरकारच्या सर्व मंत्र्यांना गावबंदी केली जाईल. असा इशाराही त्यांनी यावेळी बोलताना दिला आहे. तसेच तिसऱ्या टप्प्यांमध्ये याहीपेक्षा तीव्र आंदोलन राज्यभरात केले जाईल असेही ते म्हणाले आहे. हरितक्रांतीचे प्रणेते स्व.वसंतराव नाईक यांची आज जयंती आहे. या निमित्त आज राज्यात कृषी दिन म्हणून साजरा केला जातो. या अनुषंगाने स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे अध्यक्ष राजू शेट्टी यांनी वसंतराव नाईक यांच्या जन्म गाव गहुली इथं जाऊन वसंतराव नाईक यांच्या पुतळ्याला अभिवादन करत आज पासून कर्जमुक्ती अभियान यात्रेला सुरवात केलीय. त्यावेळी ते बोलत होते.







विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

आधुनिक केसरी


या लेखाचा पहिला भाग नाशिकच्या रेडिओ विश्वासवर गेल्या मंगळवारी आणि आज शुक्रवारी प्रसारित झाला. पुण्यातील डॉक्टर शारदा बापट यांच्यावरील अत्यंत प्रेरणादायी असा हा लेख आपल्याला नक्कीच आवडेल. माझ्या ' आनंदाच्या गावा जावे ' या पुस्तकातून युट्यूबवर ' वेध ' या सदरात आनंद नाडकर्णी डॉ. शारदा बापट यांनी घेतलेली उमेदवारी उत्सुकता म्हणून पाहिली आणि भारावून खूप. ' झपाटलेपण ते जाणतेपण ' असंभव या उमेदवारीचं नाव. डॉ शारदा बापट बोलणे ऐकलं आणि आठवण आली एखादया पूर्ण उमललेल्या गुलाबाच्या फुलाची किंवा कमळाची. जेव्हा ही फुलं पूर्ण उमललेली नसते, तेव्हा पाकळी फुलून ते फुल आपल्याला सुंदर वाटतं कारण ते आपल्या पूर्ण मनाने, नजाकती उमलून आलें. त्याचं सौंदर्य मनाला भुरळ घालतं. डॉ शारदा या व्यक्तिमत्वही मला असंच भासलं. एका व्यक्तीवर अवलंबून असलेल्या विविध गोष्टी आपण एकाच वेळी जन्माला येऊ शकत नाही. तर लेखच नाव ' एकाच जन्मी जणू..' असंभासं वाटलं. आशा भोसले यांनी गायलेलं हे नितांतसुंदर आणि अर्थपूर्ण गान आहे.




## हितगुज



पुष्प
१०४वे



**गुरुमाऊली परमपूज्य अण्णासाहेब मोरे,
दिंडोरी (नाशिक)**

## श्री स्वामी कृपा पावसाच्या पाण्यासारखी!

श्री स्वामी समर्थ महाराजांच्या नामस्मरणरुपी शेतात उत्तम पिक येण्यासाठी प्रथमतः सदाचरण पाहिजे. ते शेताच्या कुंपणासारखे आहे. दुसरी गोष्ट शुध्द अंतःकरण पाहिजे. शेतातले दगड, हरळी काढून शेत साफ करतात तसे अंतःकरणात कोणाबद्दलही द्वेष, मत्सर ठेवू नये. तिसरी गोष्ट नामस्मरण हे पेरायचे बी आहे, ते किडके असून चालणार नाही. तसेच नामस्मरण सकाम नसावे. चौथी गोष्ट तीर्थयात्रा, संतांचे आशीर्वाद त्यांची कृपादृष्टी या गोष्टी पाटाच्या पाण्यासारख्या आहेत त्यामुळे शेत चांगले व्हायला मदत होते, पाचवी गोष्ट श्री स्वामी कृपा ही तर पावसाच्या पाण्यासारखी आहे. पाटाच्या पाण्यापेक्षा पावसाच्या पाण्याची गोष्ट काही वेगळी आहे. पाऊस पडणे, न पडणे आपल्या हाती नाही, त्यामुळे पावसाबाबत अभावी पीक न येण्याचा संभव असतो. नामस्मरणरुपी शेताच्या अंगी लोह चुंबकासारखी आकर्षक शक्ती आहे म्हणून हे शेत श्री स्वामी कृपारुपी पाऊस खेचून घेऊन स्वतःवर पाडते. त्यामुळे पावसाच्या अभावी शेत वाया गेले असे कधीच होत नाही. श्री स्वामी महाराजांची कृपा सर्वांवर सारखाच वर्षाव करीत असते. ज्याने ज्या प्रमाणात चित्तशुध्दी केली असेल, त्याप्रमाणात त्याला फायदा होईल. श्री स्वामी महाराज निःपक्षपाती आहेत. त्यांच्याजवळ कोणताही भेदभाव नाही. आपण तयार झालो की त्यांची कृपा आपोआप होते. कृपेला योग्य अशी भावना तयार करणे आपले काम आहे.

## गोरक्षनाथ

आधुनिक केसरी

व तो नाथांना नमन करुन त्यांना शरण गेला नाथांनि आपली कृपादृष्टी त्याच्यावर टाकली व त्याला त्याच्या विवंचनेतुन बाहेर



काढले. पुढे त्या गावात काही काळ व्यतीत करुन भगवंत भक्तिची गोडी लोकांत जाग्रुत करुन नाथांनी पुढे गमन केले. तात्पर्यः- मनाचे समाधान जर टिकवायचे असेल, तर नामावर मन केंद्रित केले पाहिजे. काळजी केल्याने कुठलेही प्रश्न सुटत नाहीत. यासाठी जास्तीतजास्त वेळ नामस्मरणात घालवावा. गोरक्षनाथ मंदिर अहमदनगर श्री चैतन्य गोरक्षनाथ मंदिर, अहमदनगर श्री चैतन्य गोरक्षनाथ मंदिर, अहमदनगर अहमदनगर-वांबोरी रस्त्यावर डोगरगण येथुन मांजरसुंबा याठिकाणी गर्भागिरी पर्वतावर श्री गोरक्षनाथ गड आहे. या ठिकाणी श्री गोरक्षनाथांनी काही काळ वास्तव्य केले होते. हिरवाईने नटलेल्या डोंगरावर नाथांचे सुंदर मंदिर आहे. येथे श्री गोरक्षनाथांची काळ्या पाषाणाची प्राचीन स्वयंभू मुर्ती आहे. याठिकाणी दरवर्षी कार्तिक शुद्ध त्रयोदशीला गोरक्षनाथ प्रगट दिन सोहळा साजरा होतो. या दिवसाचे अनन्य साधारण महत्व आहे. डोंगरगण सह महाराष्ट्रात विविध भागात हा सोहळा साजरा होतो. या दिवशी आपल्या घरी देखिल नाथांची पुजा करुण नाथकृपेचा लाभ आपण घेऊ शकता. गोरक्षनाथ प्रकट दिनाचे दिवशी आपल्या घरी श्री नवनाथांची प्रतिमा वस्त्राने स्वच्छ पुसुन केशरी गंध लावतात.फुले अर्पण करुन हार घालावा. त्यानंतर धुप व तुपाचा दिवा लावावा. नैवद्यासाठी मलिदा अर्पण करावा. प्रतिमा पुजा नंतर आसनावर बसुन एकाग्र चित्ताने "ॐ चैतन्य गोरक्षनाथाय नमः" या मंत्राचा १०८ वेळेस माळ जप करावा व नवनाथ भक्तिसार या ग्रंथातील गोरक्षनाथांचा जन्मकथा असलेला ९ वा अध्याय वाचावा नंतर आरती करावी. गाईला नैवद्य द्यावा व सर्वांनी प्रसाद घ्यावा शक्य असल्यास यथाशक्ती अन्नदान करावे. गुरु गोरक्षनाथ यांचा संसारी लोकांसाठी अमूल्य उपदेश एकदा गुरु गोरक्षनाथ तीर्थाटन करत एका गावामध्ये आले. गावाबाहेर एक मारुतीचे देऊळ होते, तेथे ते थांबले . एक-दोन दिवस झाल्यावर हळूहळू गावातील मंडळी नाथमहाराजांकडे येऊ लागली. प्रतिदिन येण्या-जाण्यामुळे गावातील लोकांची त्यांच्याशी बरीच जवळीक निर्माण झाली. लोक त्यांना अध्यात्मविषयक शंका विचारू लागले. प्रपंचातील अडचणी सांगू लागले. तेही त्या सर्वांना योग्य उत्तरे देऊन त्यांचे समाधान करू लागले. काही वेळा ते एखाद्या विषयावर लोकांना मार्गदर्शन करुन अचंभित करत आसत. एके दिवशी गावातील मंडळी जमली असता नाथ त्यांना म्हणाले, "बाबांनो, प्रपंचामध्ये कधीच कोणाला पूर्ण सुख मिळाले नाही; म्हणून आहे त्या परिस्थितीत समाधान टिकवण्याचा प्रयत्न करावा आणि भगवंताचे नाम घ्यावे, भगवंताची निरपेक्ष सेवा करावी. यातच खरा आनंद आहे." त्यांचे हे बोलणे ऐकून साठ वर्षांचे एक गृहस्थ एकदम चिडून नाथांना म्हणाले, "प्रपंचामध्ये समाधानी रहावे, असे सांगायला काय जाते; पण ते शक्य आहे का?



आधुनिक केसरी

## शुद्ध ते अद्वैत | भिमा तिरी |


देहाचिये ठायी | स्वच्छतेची वाण ||
चर्मरोग जाण | भाळी आला ||१||
देहा सवे मन | गंगे सम ठेवी ||
ब्रह्मानंद सेवी | याच जन्मी ||२||
सबाह्य सुंदर | कर्माने असावा ||
निष्काम रूजावा | भाव एक ||३||
देहाच्या व्याधीला | औषधी उतारा ||
मना नाही थारा | नामावीन ||४||
देह मन दोन्ही | होता शुचिर्भूत ||
शुद्ध ते अद्वैत | भिमा तिरी ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

मन व पवन सम कीजिए,
गुरु प्रदेश में बाँध ।
अज गुरु की यह धारणा, तब सुमिरन
शुभ साध ।।१५।।(स्वर्वेद द्वितीय
मण्डल दशम अध्याय) ०२/१०/१५
मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :
मन आणि प्राणाला सम करून सुरतिला
(आत्म्याची चेतन शक्ती) गुरु प्रदेशात
स्थिर करणे ही अनादि सद्गुरूंच्या
विहंगम योगाची धारणा आहे. या
धारणे नंतर मंगलमय सुमिरन म्हणजेच
आंतरिक साधना सुरु होते.




स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.

## गुरु कशाला हवा ?

आधुनिक केसरी

व्यवहारात सुद्धा आपल्याला गुरू करावा लागतो, तर त्याच्यापेक्षा अवघड ज्ञान होण्यासाठी गुरू नको असे म्हणून कसे चालेल ? प्रपंचात सुखदुःख झाले, समाधान मिळाले नाही, तर मग खरे सुख कुठे आहे आणि ते मला कोण दाखवील, अशी ज्याला तळमळ लागेल तोच गुरू करील. प्रपंच आम्हाला कडू वाटला तरच शिष्य होण्याचा प्रश्न. शिकावे असे ज्याच्या मनात येते तो शिष्य, आणि जो शिकवितो तो गुरू. मला काही कळत नाही असे ज्याला वाटते तोच गुरू करील. मी ' राम, राम ' म्हणतो, वाईट मार्गाने जात नाही, मग गुरु कशाला हवा, असे काहीजण म्हणतात. ' मी ' केले ही जाणीव आड येते, म्हणून सद्गुरूची आवश्यकता आहे. सत्कर्माचा अभिमान जर आपल्याकडे घेतला तर रामाचा विसर नाही का पडला ? अभिमान गेल्याशिवाय राम नाही भेटणार. देवाजवळ गेला तरी नामदेवाचा अभिमान नाही गेला, म्हणून भगवंतांनी त्याला ' गुरू कर ' म्हणून सांगितले. संताच्या कृपेने दुखणे बरे झाले



म्हणून त्याला मानणे हे खरे नव्हे. जो शिष्याला विषयात ओढील त्याला गुरू कसे म्हणावे ? जो काही चमत्कार करून दाखवील त्याला आम्ही बुवा म्हणतो. संताची परीक्षा आम्ही बाह्यांगावरून करतो. सर्वांभूती भगवंत ज्याला पहाता येईल त्याला संताची खरी ओळख होईल. संताच्या संगतीत आपल्या मनावर जो परिणाम होतो, त्यावरून आपण संताची परीक्षा करावी. माझे चित्त जिथे निर्विषय होईल तिथेच संताची खरी जागा म्हणता येईल. ज्याला भगवत्प्राप्तीची तळमळ लागली आहे, त्यालाच शिष्य म्हणावे. जो गुरुआज्ञेबाहेर जात नाही, आणि गुरू हेच भगवंतप्राप्तीचे साधन मानतो, तो सच्छिष्य होय. गुरूपरता देवधर्मच नाही मानू. काही कानडी माणसे महाराष्ट्रात आली. त्यांना मराठी येत नव्हते. त्यांनी एक दुभाषी गाठला आणि त्याच्या मागोमाग ती पुष्कळ ठिकाणी हिंडली. त्यांची चिंता आणि जबाबदारी त्या दुभाष्यावर पडली. तशी आपण दुभाष्याची म्हणजे सद्गुरूची संगत केली पाहिजे. तो म्हणेल तिथे जावे, तो सांगेल तसे करावे, मग परमात्मा मिळेलच. शास्त्रे आणि वेद अनंत आहेत; ते शिकायला आपल्याला वेळ कुठे आहे ? सद्गुरूंनी नवनीताप्रमाणे सर्व साधनांचे सार असे जे नामसाधन सांगितले, ते आपण करावे, म्हणजे भगवंताचे प्रेम लागेलच. बाजारात गेल्यावर, जो माल आपल्याला अनुकूल आणि माफक दराचा असेल तोच घ्यावा, त्याप्रमाणे परमार्थाच्या अनेक साधनांत आपल्याला अनुकूल आणि माफक असे नामस्मरण हेच एक उत्तम साधन आहे; तेच करावे आणि आनंदाने रहावे. व्यवहारात सुद्धा आपल्याला गुरू करावा लागतो, तर त्याच्यापेक्षा अवघड ज्ञान होण्यासाठी गुरू नको असे म्हणून कसे चालेल ? प्रपंचात सुखदुःख झाले, समाधान मिळाले नाही, तर मग खरे सुख कुठे आहे आणि ते मला कोण दाखवील.

## देहान्तनिरूपण

आधुनिक केसरी

वायू कुठे प्रगट होतो तर कुठे गुप्त होतो . आपण पाहिले आहे की वारा



सौ. उज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

जेव्हा जोराचा येतो तेव्हा तो ताशी दोनशे ते तीनशे कि ,मी वेगाने वहातो मग ते चक्रीवादळ असो किंवा भूमी वादळ असो तो आपल्या बरोबर मोठं मोठी झाडे, ऊंच ऊंच इमारती सार्व काही भूईसपाट करून टाकतो. तेव्हा या भयानक वादळात किती तरी लोक मृत्युमुखी पडतात. वारा अंगावरून गेला असं आपण म्हणतो तेव्हा त्या माणसाचे हातपाय सुकतात. काढणीला आलेली पिके भुईसपाट होतात. अनेक प्रकारच्या वा-यांनी रोग होतात. वायूमुळे आकाशात वीज कडाडले ती पृथ्वीवरील कोणत्याही जीवाला धोका निर्माण करू शकते. ढगाला वायूचा संपर्क झाला की पाऊस पडतो. काही पौराणिक मत या ठिकाणी मांडली आहेत ती थोडक्यात सांगण्याचा प्रयत्न करत आहे. दीप रागाने दिवे लागतात. गायकांना वायूमुळे राग गाता येतात. मेघ मल्हार रागाने पाऊस पडतो. वायू फुंकल्याने माणसाला भुरळ पडते. वायूमुळे अंगावरील गळवे कोरडे पडतात. वायूमुळे अनेक मंत्र परिणाम करतात. मंत्राने देवता प्रगट होतात. हातचलाखीचे खेळ करतात. वेगवेगळी रूपे घेऊन लोकांना चकित करतात. जादुच्या करामती मंत्राने करता येतात.

## निरूपण

आधुनिक केसरी

ऐसा कृपाळु देवाधिदेव । नेणवे जयाचें लाघव ।
जो सांभाळी सकळ जीव । कृपाळुपणें ॥ ५८॥
ऐसा सर्वात्मा श्रीराम- । सांडून, धरिती विषयकाम ।
ते प्राणी दुरात्मे अद्धम । केलें पावती ॥ ५९॥
रामेविण जे जे आस । तितुकी जाणावी नैराश ।
माझें माझें सावकाश । सीणचि उरे ॥ ६०॥
जयास वाटे सीण व्हावा । तेणें विषयो चिंतीत जावा ।

आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

मंगळवार, २ जुलै २०२४

adhunikkesari.com

# ग्रामीण भागातील विध्यार्थी देखील जिद्दीच्या बळावर गुणवत्तेचे यशोशिखर गाठू शकतो : प्रा. चिराग सेनमा



आधुनिक केसरी न्यूज

**धर्मापुरी :** ग्रामीण भागात सुध्दा गुणवत्ता ठासून भरलेला असून येथे गुणवत्तेची कसलीच कमतरता नाही.आपण मन लाऊन आणि जिद्दीने प्रयत्न केला तर कोणत्याही पदाला गवसणी घालू शकतो. असे प्रतिपादन आय आय बी इन्स्टिट्यूटचे संचालक प्रा. चिराग सेनमा यांनी केले. ते धर्मापुरी ता परळी वै येथील जिजामाता प्रा मा व उ मा विद्यालयात कै शिक्षणमहर्षी गौतमरावजी बापू नागरगोजे यांच्या प्रथम स्मृतिदिनानिमित्त आयोजित चार दिवसीय स्मृतीसमारोहाची सांगता समारंभ प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विजयकुमार गौतमराव बापू नागरगोजे.(सचिव) इंद्रायणी प्रतिष्ठान व सरस्वती प्रतिष्ठान हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून प्राचार्य रामकृष्ण बदने ग्रामीण महाविद्यालय वसंतनगर मुखेड.अनिल चोरमले उपविभागीय पोलिस अधिकारी अंबाजोगाई. डॉ सरस्वती विजयकुमार नागरगोजे कार्यवाह इंद्रायणी प्रतिष्ठान व सरस्वती प्रतिष्ठान. प्राचार्य रामहरी शामराव गित्ते. यांची उपस्थिती होती.

पुढे बोलताना प्रा. चिराग सर यांनी दोन्ही प्रतिष्ठान मधील गुणवंताना, गरजू होतकरू विद्यार्थ्यांना मोफत शिक्षण देऊ असा शब्द देखील दिला. पाहुण्यांच्या हस्ते सरस्वती पूजन व कै. शिक्षणमहर्षी गौतमराव बापू नागरगोजे, सोबत कै. शिवशलामाई गौतमराव बापू नागरगोजे यांच्या प्रतिमापूजनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य रामहरी गित्ते यांनी केले.याप्रसंगी बोलताना प्राचार्य रामकृष्ण बदने सरांनी आईची महती,कै शिक्षणमहर्षी गौतमराव बापू नागरगोजे यांचे ग्रामीण भागातील शैक्षणिक कार्य, विद्यार्थ्यांनी स्वतः च्या मधला स्वत्व शोधा आणि व्यसन व सोशल मीडिया पासून दूर राहण्याचा सल्ला दिला.अनिल चोरमले यांनी स्पर्धा परिक्षेच्या माध्यमातून अनेक संधी उपलब्ध असल्याचे सांगितले. संस्थेच्या कार्यवाह डॉ. सरस्वती विजयकुमार नागरगोजे यांनी सर्व स्टाफचे कौतुक करुन हा सोहळा यशस्वी केल्याबद्दल अभिनंदन केले. यानंतर विविध स्पर्धांच्या विजेत्यांना पारितोषिके देऊन गौरविण्यात आले. याप्रसंगी सुदर्शन गुट्टे बाळासाहेब माले, सतिश शिरसाठ, महादेव फड, काशिनाथ कातकडे,केशव प्रा डॉ केशव कातकडे, गुरूदास आश्रम घाटनांदूरचे तुकडोजी महाराज,प्रसाद नागरगोजे व्यंकटी गित्ते,भास्करबापू फड,श्रीमती खंडाळे मॅडम प्रतिष्ठान मधील सर्व मुख्याध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, आजी माजी विद्यार्थी पालक उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन एम के मुंडे यांनी तर आभार प्रदर्शन आदर्श विद्यालय मांडवाचे मुख्याध्यापक भताने विष्णू यांनी मानले.



# ज्येष्ठ पत्रकार कमलाकर जोशी यांचे निधन

आधुनिक केसरी न्यूज



**नांदेड :** ज्येष्ठ पत्रकार कमलाकर जोशी (वय ७०) यांचे रविवारी दुपारी १ वाजता अल्पशा आजाराने निधन झाले. दोन दिवसांपूर्वी प्रकृती बिघडल्याने शहरातील एका रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. त्याच ठिकाणी त्यांनी अखेरचा श्वास घेतला. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, एक मुलगी, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे. रात्री त्यांच्या पार्थिवदेहावर गोवर्धनघाट स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. कमलाकर जोशी यांनी लोकमतमध्ये जिल्हा प्रतिनिधी म्हणून ३५ वर्षांहून अधिक काळ त्यांनी काम केले. तत्पूर्वी त्यांनी दै. गोदातीर समाचार आणि त्यानंतर गावकरी, तरुण भारत या वर्तमानपत्रातही काम केले. पत्रकारितेच्या काळात त्यांना अनेक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले होते. लोकमतमधून १८ मार्च, २०१४ रोजी सेवानिवृत्त झाल्यानंतर त्यांनी दैनिक आधुनिक केसरीसह स्थानिक वर्तमानपत्रांमध्ये राजकीय, स्तंभ लिखाण केले. अधिस्वीकृती समितीचे सदस्य म्हणूनही त्यांनी काम पाहिले त्यांच्या अंत्यविधीवेळी होते. शोकसभा घेण्यात आली. यावेळी दै. गोदातीर समाचारचे संपादक केशव घोणसे पाटील, पत्रकार संघटनेचे अध्यक्ष गोवर्धन बियाणी, शिवसेनेचे प्रल्हाद इंगोले, जिल्हाप्रमुख उमेश मुंडे, नाथा चितळे, आर. पी. कदम आदींनी आपल्या शोकमग्न भावना व्यक्त केल्या. अंत्यविधीस विविध क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती होती.

# मोटरसायकल व जलपरी चोरट्यांच्या स्थानिक गुन्हे शाखेने आवळयाला मुसक्या

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** मोटरसायकली आणि जलपरी चोरणाऱ्या टोळीला स्थानिक गुन्हा अन्वेषण विभागाचे पोलिस निरीक्षक श्रीराम पवार यांच्या नेतृत्वाखालील पथकाने दमदार कारवाई केली आहे. पथकातील सात जणांना बेड्या ठोकत सुमारे सव्वा चार लाखांचा मुद्देमाल जप्त केला आहे. धुळे शहरासह जिल्ह्यात दुचाकी आणि पाण्याच्या मोटारी चोरीचे प्रमाण वाढल्याने चोरट्यांचा शोध घेण्यासाठी पोलिस अधिक्षक श्रीकांत धिवरे यांनी एलसीबी पीआय श्रीराम पवार यांना कारवाई करण्याच्या सुचना दिल्या होत्या. त्यानुसार पीआय पवार यांनी आदेश देऊन कावठी ता. धुळे येथील सुदाम ठाकरे व त्याच्या साथीदारांनी दुचाकी चोरल्याची पक्की खबर पीआय पवार यांना मिळाली. त्या आधारे पीआय पवार यांच्या पथकाने सुदाम ठाकरे, प्रमोद दगडू पिंपळे, रामदास तुकाराम पिंपळे, सतीश पिंपळे, दीपक सुरेश सोनवणे, प्रेमराज ज्ञानेश्वर शिंदे सर्व रा. कावठी व मोहम्मद इरफान मोहम्मद आतिक यांना बेड्या ठोकल्या. त्यांच्याकडून चोरीच्या १५ मोटार सायकली, एक बॅटरी, सहा जलपरी असा ४ लाख २३ हजारांचा मुद्देमाल एलसीबीने ताब्यात घेतला आहे. या चोऱ्या धुळे तालुका सोनगीर, निजामपूर पोलिस स्टेशनच्या हद्दीत घडल्या होत्या. पोलिस अधिक्षक श्रीकांत धिवरे, अपर पोलिस अधिक्षक किशोर काळे यांच्या मार्गदर्शनाखाली एलसीबी पीआय श्रीराम पवार, पीएसआय प्रकाश पाटील, आघाव, हे. कॉ. हेमंत बोरसे, मच्छिंद्र पाटील, योगेश चव्हाण, प्रल्हाद वाघ, योगेश साळवे, संजय सुरशे, राजीव गिते यांच्या पथकाने ही कारवाई केली.



# कळंब पोलीस ठाण्याच्या मोकळया जागेत होणार ऑक्सीजन हब, वॉकिंग ट्रॅक

आधुनिक केसरी न्यूज



**कळंब :** निसर्ग प्रेमी वृक्ष लागवडीचे खुप आवड असलेले वृक्षांमधील विविध जातीचे अभ्यासु पोलीस अधीक्षक अतुल जी कुलकर्णी यांच्या संकल्पनेतून कळंब पोलिस ठाणे च्या बाजूला असलेल्या मोकळ्या जागेत'अटल घन वन' योजनेअंतर्गत वृक्ष लागवड करण्यात येणार आहे बाजूला असलेल्या मोकळ्या जागेत लागवडीकरिता जमीन तयार करण्याचे काम चालू आहे. या जागेवर सहा हजार देसी वृक्ष घन पद्धतीने लागवड करण्यात येणार आहे लवकर पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी व विभागीय सामाजिक वनीकरण अधिकारी करे साहेब धाराशिव यांच्या हस्ते वृक्ष लागवड लवकर करण्यात येणार आहे या मोकळ्या जागेवर ऑक्सीजन हब वॉकिंग ट्रॅक ओपन जिम सुरू करण्यात येणार असून यामध्ये सामाजिक वनीकरण व पोलीस विभागाची कर्मचारी सहभाग असणार आहे माननीय पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी व अप्पर पोलीस अधीक्षक गौहर हसन कळंब पोलिस उपविभागीय अधिकारी संजय पवार यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस वृक्षप्रेमी निरीक्षक रवी सानप व कळंब सामाजिक वन विभागाचे वनपरिक्षेत्र अधिकारी संतोष दोडके यांच्या देखरेखीखाली वृक्ष लागवड करण्यात येणार आहे यामुळे कळंबकर यांना ऑक्सीजन हब व ॉकिंग ट्रॅक ओपन जिम याचा फायदा होणार आहे सध्या जमीन तयार करण्याचे काम चालू आहे यावेळी कळंब पोलीस स्टेशनचे पोलीस वृक्षप्रेमी पोलीस निरीक्षक रवी सानप, सामाजिक वनीकरण विभाग कळंब चे वनपरिक्षेत्र अधिकारी संतोष दोडके त्या विभागाचे वनपाल एस आर कुलकर्णी , संतोष टोणगे कर्मचारी व पोलिसा आमलदार शिवाजी राऊत , महादेव मुंडे, दत्तात्रय शिंदे, विजय मानखुळे महिला पोलीस कर्मचारी स्वाती कांबळे, संजीवनी वरडकर, कल्पना पत्तेवर हे कर्मचारी उपस्थित होते. व लवकरच पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी व विभागीय सामाजिक वनीकर अधिकारी करे साहेब यांच्या हस्ते वृक्ष लागवडीचे उद्घाटन होणार आहे.

# दहावी, बारावीची शैक्षणिक कागदपत्रे हरवली आहेत

मंठा तालुक्यातील जयपूर काकडे येथील विद्यार्थी ऋषिकेश रामप्रसाद काकडे व नागेश महादेव काकडे हे दोघेही 25 जून रोजी दुपारी एक वाजता जयपूर येथील जय भवानी विद्यालयात काही कामानिमित्त गेले असता त्यांनी शैक्षणिक कागदपत्रांची बॅग गाडीला लटकवून ठेवली होती. थोड्या वेळाने बाहेर आल्यावर कळले की गाडीला लटकून ठेवलेली बॅग दिसत नाही.त्यांनी खूप शोधण्याचा प्रयत्न केला परंतु सापडली नाही.यामध्ये ऋषिकेश काकडे यांचे दहावी,बारावीची मार्कशीट व सनद आणि बारावी पासची टीसी हरवली तर नागेश काकडेची बारावीची टीसी हरवली आहे. शेवटी ऋषिकेश काकडे व नागेश काकडे यांनी 26 जूनला सेवली पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. संबंधित कागदपत्रे सापडल्यास सेवली पलीस ठाणे किंवा वरील पत्त्यावर जमा करण्याचे आवाहनही करण्यात आले आहे.

## शरद पवारांची पोस्ट

आधुनिक केसरी

स्वांतत्र्यपूर्व काळातील तीन फौजदारी कायदे सोमवारपासून रद्द झाले असून त्याजागी तीन नवे फौजदारी कायदे अमलात आले आहेत. सोमवारपासून या नव्या कायद्यांनुसार कार्यवाही करण्यात येणार आहे. परंतु, या कायद्यांवरून विरोधकांनी सत्ताधाऱ्यांवर निशाणा साधला आहे. हे कायदे संसदेत चर्चेविनाच संमत करण्यात आल्याचा दावा सुप्रिया सुळेंनी केला होता. आता शरद पवारांनीही यावरून केंद्र सरकावर टीका केली आहे. शरद पवार एक्सवर पोस्ट करत म्हणाले, देशाच्या कायदा सुव्यवस्थेतील बदल हा देशाच्या विरोधी पक्षातील १५० खासदारांना निलंबित करून करण्यात आला ही वस्तुस्थिती कोणीही नाकारू शकत नाही. या बदलात चर्चा आणि सूचनांचा अभाव दिसून येतोय. यासह देशाच्या सुरक्षा यंत्रणेवर येणारा ताण अधिक ठळक होतो. ते पुढे म्हणाले, काळानुरूप बदल होणे गरजेचें असले तरी यात पारदर्शकता आणण्यासाठी चर्चा घडवून अधिक ठोस पावले उचलता येऊ शकली असती. मात्र एककलमी कार्यक्रम राबवण्याच्या मानसिकतेने झपाटलेल्या राज्यकर्त्यांकडून चर्चेची अपेक्षा करणे चुकीचे ठरेल, अशी खरपूस टीकाही त्यांनी केली. ब्रिटिशकालीन भारतीय दंड संहिता (आयपीसी), फौजदारी प्रक्रिया संहिता (सीआरपीसी) आणि भारतीय पुरावा कायद्याच्या जागी केंद्राने २०२३ मध्ये तीन नवे फौजदारी कायदे संसदेत मंजूर करून घेतले. नव्या कायद्यांत तीन वर्षांच्या कालावधीत संपूर्ण न्यायप्रक्रिया पूर्ण करण्याची तरतूद आहे. कायद्याच्या ३५ कलमांमध्ये न्यायप्रक्रियेसाठी कालावधीचे बंधन दिले आहे. फौजदारी खटल्यांमध्ये युक्तिवाद पूर्ण झाल्यावर एक ते दीड महिन्याच्या कालावधीत निर्णय सुनावण्याची तरतूद आहे. न्यायालयात पहिल्या सुनावणीनंतर ६० दिवसांच्या आत आरोपपत्र दाखल करणे बंधनकारक आहे. स्वातंत्र्यपूर्व काळात ब्रिटीशांनी भारतीयांचा स्वातंत्र्यलढा दडपून टाकण्यासाठी 'रौलेट अ‍ॅक्ट' आणला होता. भाजपाप्रणीत राष्ट्रीय लोकशाही आघाडी सरकारने तमाम भारतीयांच्या संवैधानिक अधिकारांना दडपण्यासाठी हा नवा कायदा आणला आहे. लोकशाही आणि संविधानाचा आत्मा पणाला लागलेला असून आम्ही यांच्याविरोधात आवाज उठविल्याखेरीज राहणार नाही. या कायद्यांची अठराव्या लोकसभेने समिक्षा करणे गरजेचे आहे. संवैधानिक मूल्यांचे जतन करण्यासाठी हे आवश्यक आहे, असेही म्हणत सुळेंनी केंद्र सरकारवर टीका केली आहे.


शांताराम मगर
संपर्क क्र. 9421417540

## मग ऊत्तम फोटोग्राफर मुख्यमंत्री झाला म्हणून काय झालं ?

आधुनिक केसरी

**एखाद्या व्यक्तीला फोटोग्राफीची आवड असेल पण तो मुख्यमंत्री झाला तर अडचण होते असे म्हणत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उद्धव ठाकरे यांना टोला लगावला आहे. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते आमदार अमित साटम यांच्या "उडान" पुस्तकाचे लोकार्पण झाले. यावेळी बोलतांना त्यांनी करिअर आणि पॅशन याबाबत भाष्य केले. त्यांच्या विधानाची सध्या जोरदार चर्चा सुरू आहे. यावेळी त्यांनी उद्धव ठाकरेंचे नाव न घेता टोला लगावला आहे. "एखाद्या व्यक्तीला ज्या गोष्टीची आवड असते, पॅशन असते, त्या व्यक्तीने त्याच गोष्टी कराव्यात. म्हणजे एखाद्या व्यक्तीला फोटोग्राफीची आवड असेल पण तो मुख्यमंत्री झाला तर अडचण होते. आपल्या पॅशनलाच करिअरच्या रूपात घडवणे गरजेचे असते", असे फडणवीस म्हणाले.**



मी कोणाचे नाव घेतले नाही केवळ उदाहरण देत आहे असेही त्यांनी स्पष्ट केले. उप मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलेल्या वक्तव्यामुंळे तमाम छायाचित्रकार पत्रकार यांचा हा आपमान आहे आहे.आम्ही आपल्या वक्तव्यांचा जाहिर निषेध करतो. देवेंद्रजी तुम्ही दररोज छायाचित्रकार पत्रकार यांच्या कॅमेर्‍यामुळेच तुम्ही ईतपर्यंत पोहचले तुम्ही त्वरित छायाचित्रकारांची पत्रकांराची माफी मागावी आशी मागणी छायाचित्रकार शांताराम मगर यांनी केली आहे. फोटोग्राफीच्या कलेला आणि व्यवसायाला कमी लेखण्याचा प्रकार आहे. राजकारणात असलेल्या अनेक व्यक्ती विविध व्यावसायिक असतात. कुणी शेतकरी तर कुणी उद्योजक तर कुणी कारखानदार असतात. या न्यायाने संदीपान भूमरे यांनी अजून कारखान्याच्या गेटवरच असावे काय? किंवा आढळराव पाटलांनी उद्योगच करावेत काय?
गुलाबराणी टपरीच चालवावी काय नरहरि झिरवळ यांच्या सारखा एक बांधकाम करणारा व्यक्ती विधानसभेचा सभापती होऊ शकतो. ज्याने त्याने आपापला व्यावसाय करावा असा मनुवादी विचार यानिमित्त नव्याने समोर आणला जात आहे.

फडणवीसांनी तरी मग राजकारणात का यावे? त्यांनीही आपली फडणवीसी करीत वह्या-पोथ्या संभाळाव्या आपण पहातो की अनेकदा देशाचे किंवा राज्याचे आरोग्यमंत्री हे डॉक्टर असतात, शेतकरी हे कृषिमंत्री असतात, साहित्यिक, कवी राज्यसभेत किंवा विधानपरिषदेवर जातात, किंबहुना या विविध घटकांना विशेष स्थान विधिमंडळात दिले जाते. मग छायाचित्रकारांनी यांचे काय घोडे मारले? मी तर म्हणतो की राज्यसभा आणि विधानपरिषदेमध्ये छायाचित्रकारांसाठी विशेष जागा ठेवली पाहिजे.फडणवीसांनी केलेल वक्तव्य फोटोग्राफीच्या कलेला आणि व्यवसायाला कमी लेखण्याचा प्रकार आहे. फोटोमध्ये सामाजिक, सांस्कृतिक बंध असतात. ते शोधता आले पाहिजेत प्रत्येक ठिकाणी त्या-त्या संस्कृतीचा फोटोशी संबंध येतो. अनेक बदलाची नोंद फोटोग्राफीमुळे घेता येते.फोटो वाचता येणे ही एक मोठी कला असून ती लगेचच आत्मसात होत नाही. कोणत्याही बातमीतछायाचित्रहे त्या बातमीला जिवंतपणे वाचकांसमोर मांडण्याचे काम करीत असते. त्यामुळे छायाचित्रहा वृत्तपत्राचा आत्मा आहे

कॅमेरा आला की, फोटोग्राफर होता येत नाही. हे लक्षात घ्यायला पाहिजे. फोटोग्राफी ही एक कला आहे.
समोर एखादं दृष्य दिसते, घटना घडते; पण क्लिक कधी करायचे याची अचूक वेळ ज्याला समजली तो चांगला फोटोग्राफर होऊ शकतो. ज्याच्याकडे निर्मितीक्षमता आहे, ज्याचा दृष्टिकोन विकसित झालेला आहे, ज्याला प्रकाश-संधी प्रकाशाची उत्तम जाण आहे, जो सर्जनशील गोष्टींचा शिस्तबद्ध विचार करू शकतो, रंगसंगतीची उत्तम जाण नवनिर्मितीची क्षमता, कलात्मक भान, कल्पकता, निरीक्षण शक्ती, आत्मविश्वास, प्रसंगावधान, कौशल्ये आसलेला व्यक्तिच ऊत्तम छायाचित्रकार होऊ शकतो. उद्धव ठाकरे यांनी काढलेली छायाचित्र जहांगीर आर्ट गैलरी मध्ये लागलेली आहेत. दींडी सोहळ्यातील पहावा विट्ठल या फोटोग्राफी पुस्तकात छापलेली आहे.उध्दव ठाकरे हे ऊत्तम छायाचित्रकार आल्यामुळे त्यांचा आम्हा छायाचित्रकांना सार्थ अभिमान आहे.फडणविसांनी केलेल वक्तव्य हे फोटोग्राफीच्या कलेला आणि व्यवसायाला कमी लेखण्याचा प्रकार आहे.


गणेश खाडे
संपर्क क्र. 9011634301

## चांगल्या बाबींपेक्षा वाईट बाबींचे आकर्षण जास्त

आधुनिक केसरी

**प्रत्येक युगाच विशेष असं लक्षणं असतं विद्यमान युग ज्याला आपण कलयुग संबोधतो या कालयुगाच देखिल प्रमुख लक्षण हेच आहे कि दुर्गुणांच प्रचंड आकर्षण या युगात आपल्याला सगळीकडे थैमान घालताना दिसत आहे.जीवनातील चांगल्या वाईट बाबी ह्या प्रत्येकाला समजत असतात तरी सुद्धा चांगल्या बाबी पेक्षा वाईट बाबींच आकर्षण जास्तच असतं हे जगातील सगळ्यात मोठे आश्चर्य म्हटले तरी वावगे ठरणार नाही.समाजिक पातळीवर पाहिलं तर वयोगट कोणताही असो त्या त्या वयोगाटात दुर्गुणांचा आकर्षण हे प्रमुख लक्षण दिसतच.साधारणता दहा पंधरा वर्षं वय होईपर्यंतची लहान मुलं वगळली तर प्रत्येकाला चांगलं काय वाईट काय आपल्या फायद्याचे काय नुकसान दायाक काय हे कळत पण वळत नाही.**

असंच म्हणावं लागेल कारण चांगल्या हितकारक बाबी शिकवाव्या लागत.परंतु ज्या बाबींमुळे आपलं अहित होणार आहे ते माहित आहे शिकावायला कोणी नाही तरी आपण त्या सहज आत्मसात करतो.स्वतः च्या जीवनाच कल्याण होण्यासाठी उपयोगी असणारे सद्गुण व सदाचार हे आपल्याला शिकावाव लागतत मात्र ज्यामुळे वाईट घडत ते अवगुण मात्र आपोआप आत्मसात होतात हे सध्याच्या काळातील सगळ्यात भायनक असं वास्तव आहे. सृष्टीवरील सगळे चांगले सदगुण सात्विक हितकारक बाबी ह्या शिकवण्यासाठी कोणीतरी मार्गदर्शक म्हणून प्रयत्न करत असत. तरी सुद्धा अनेक वेळा शिकावले तरी त्या बाबी आत्मसात होताना अडचणी येतात. आणि यदाकदाचित त्या आत्मसात झाल्या तरी त्या टिकवून ठेवण्यासाठी सुद्धा नियमित प्रयत्न कारावे लागतात. हितकारक बाबींसाठी अनेक मार्गदर्शक वेगवेगळे धार्मिक ग्रंथ तत्वज्ञान वेळेनुरूप अनेक महापुरुष कार्य करत असतात. तसेच समाजाच्या पातळीवर सुद्धा कुटुंबा पासुन अनेक घटक यासाठी कार्यरत असतात.या उलट वाईट अहितकारक कार्य करण्यासाठी मात्र कोणत्याही प्रकारच मार्गदर्शक तत्वज्ञान असं काहीही लागत नाही अहितकारक कार्यचा कोणी मार्गदर्शक आहे असं आपण कधी ऐकलं आहे का?अगदी सहज चालता बोलता आपण वाईट बाबी आत्मसात करतो आणि म्हणूनच अवगुण प्राप्त करण्यासाठी कोणी विशेष प्रयत्न केल्याचं आज पर्यंत तरी ऐकिवात नाही.कारण वाईटाच आकर्षण जास्त प्रमाणात असत.

बहुतांश लोक अहितकारक बाबीच आत्मसात करतात हे दुर्दैव आहे.मानवी जीवन आणि जीवनातील काही दैनंदिन बाबी ज्या प्रत्यक्ष अप्रत्यक्ष आपल्या जीवनातील परिणामांना प्रभावित करत असतात यातील काही बाबी ह्या हितकारक असतात तर काही अहितकारक असतात.जीवनातील कल्याणकारी बाबी ह्या करण्यासाठी मन बुद्धी यावर वारंवार नियंत्रण प्रस्थापित कराव लागत.आपण सजग असतो.तरी सुद्धा आपण कधी रस्ता चुकतो आणि अहितकारक बाबी आपण किती सहजपणे अंगिकारतो ते कळत सुद्धा नाही. कारण अहितकारक बाबींच आपल्यला किती प्रचंड मोठ्या प्रमाणात आकर्षणं असतं किती उत्सुकता असती किती गोडी असते. अगदी आयुष्याची वाट लागली तरी चालेल पण अहितकारक बाबींच आकर्षण आपण सोडत नाही. जीवनाच वाटोळं करणार्या बाबी ह्याच आपल्यला योग्य वाटतात चांगल्या वाटतात या पेक्षा वाईट बाब काय असु शकत.आणि म्हणूनच अहितकारक बाबींच प्रचंड आकर्षण हे सध्याच्या काळातील सगळ्यात मोठे आश्चर्य आहे. तसं पाहिलं तर आकर्षण हा मानवी स्वभावाचा मुख्य गुण दोष असतो.पण यामध्ये सुद्धा चांगल्या, सात्विक,धर्म शास्त्रानुसार मान्य बाबी, सद्गुणी,समाज हितकारक,लोक उपयोगी, सदाचारी बाबींच आकर्षण असल पाहिजे.पण जीवनातील कल्याणासाठी आवश्यक अशा ह्या बाबी सहजासहजी कोणीही स्वीकारत नाही.त्यासाठी अनेक घटक सक्रिय प्रयत्न करत असतात.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. कार्यकारी संपादक - बाजीराव श्रीराम खांदवे, अहमदनगर कार्यालय - तिसरा मजला, खरेदी विक्री संघाची जुनी इमारत, मार्केट यार्ड, स्टेशन रोड, अहमदनगर ४१४००१, फोन ९८२२१०७६५०. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद छत्रपती संभाजीनगर न्यायालयाच्या कक्षेत) आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Chhatrapati Sambhajinagar Industrial Co-op, Society, Station Road, Chhatrapati Sambhajinagar 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Chhatrapati Sambhajinagar (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * Executive Editor - Bajirao Shriram Khandave. Ahmednagar office - third floor, kharedi - vikri sangh old building, Market yard Station Road, Ahmednagar 414001. Phone 9822107650.(* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Chhatrapati Sambhajinagar court.) RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# अवैध व्यवसायास लगाम कधी लावणार ?

## मटका, गुटका खुलेआम : भोकर शहरातील प्रकार

आधुनिक केसरी न्यूज

**भोकर :** तालुक्यात मागील अनेक दिवसांपासून अवैध व्यवसाय फोफावले आहेत. प्रामुख्याने शासनाने बंदि घातलेला घातक गुटका, मटका, पत्याचे क्लब यासह अन्य प्रकार राजरोसपणे सुरू आहेत.सबंधीत विभागाने याकडे कानाडोळा केल्याने अनेकाचे संसार उद्धवस्त होत आहेत.अशा अवैध व्यवसायाला लगाम कधी लागणार अशी मागणी त्रस्त झालेल्या नागरीकातून केली जात आहे.
तालुक्यात अवैध व्यवसायाला थारा नाही जर कुणी यास खतपाणी घालत असेल तर त्याची गय केली जाणार नाही असा सज्जड दम माजी मुख्यमंत्री तथा खासदार अशोक चव्हाण यांनी दिला होता. असे असताना शहर आणि परिसरात अवैध धंदे फोफावले आहेत.प्रारंभी पडद्याआड चालु असलेले अवैध व्यवसाय आता खूलेआम सूरू झाले आहेत. यात प्रामुख्याने शासनाने रसायन मिश्रीत घातक गुटक्याने अनेकांना गंभीर आजाराने विळखा घातल्याने जीव गमावावा लागला आहे.अशा गुटका पुडी विक्रीवर बंदी घालण्यात आली आहे.सदरील कंपणीच्या चाणाक्ष उद्योजकांनी नामी शक्कल लढवून वेगवेगळ्या दोन पुड्या तयार करून विक्री सुरू केली आहे.तर काहि पुड्या पूर्वी प्रमाणे बाजारपेठेत सहज उपलब्ध होत आहेत. शहरातील काही गोळ्याबिस्कीट व्यापारी यात गुंतलेले आहेत. स्थानिक आणि वरिष्ठांच्या आशिर्वादाने व्यवसायाला भरभराटी आली आहे.अधिकारी नाममात्र कार्यवाहीचे नाट्य रंगवून मोकळे होतात अद्याप ठोस कार्यवाही करण्यात आली नाही.याच पध्दतीने शहरातील गजबजलेल्या मूख्य आंबेडकर चौक, बसस्थानक, परिसरात जागोजागी खुलेआम मटका बुक्या थाटुन आकड्यांचा बाजार सूरू आहे.यात यूवक,किरकोळ व्यापारी आहारी गेल्याने संसार उद्धवस्त होत आहेत. या शिवाय शहराच्या बाहेर चोरीछूपे पत्याचे क्लब चालू असुन लाखो रूपयांची उलाढाल होत असल्याचे समजते. अशा व्यवसायास प्रतिबंध करण्यासाठी कुणीच धाडस करीत नसल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे. संबंधित वरिष्ठांनी त्वरित लक्ष देऊन दोषींवर कठोर कार्यवाही करावी अशी मागणी जोर धरू लागली आहे.वरीष्ठ काय निर्णय घेतात याकडे सर्वांचे लक्ष लागून आहे.



# ऐतिहासिक वेरुळ लेणीतील धबधबा लागला कोसळू

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** तालुक्यातील व जगप्रसिध्द वेरुळ लेणी येथे आखेर जुन महिन्याच्या सरतीला धबधबा वाहता झाला असुण पर्यटक खुश आनंदी झाले असुन बघण्यासाठी मोठ्या गर्दीचे चित्र आहे. जगप्रसिध्द वेरुळ लेणी येथे नेहमीच प्रचंड गर्दीचे चित्र आहेत .परंतु पावसाळ्यांत लेण्या, हिरवीगार डोंगर त्यात उंचावरून पाण्याचा धबधबा कोसळणे त्याचा मोठा आवाज ओला होणे यामुळे पर्यटक विशेष आकर्षित होतात सात जुन पासून सुरु झालेल्या पावसाने धबधबा वाहता झाला नव्हता आखेर दि ३०जुन महिना अखेर दुपारी जोरदार पावसानंतर सिताची न्हाणी लगत वर अंदाजे ७०० फुटांवरून पाण्याचा धबधबा सुरु झाल्याने पर्यटक एक वेगळाच अनुभव मौजमजा घेत आहे. शनिवारी रविवारी लेणी व परिसरात तौबा गर्दी होती वेरुळ गाव ते लेणी आखेर खुलताबाद रोड पर्यंत दोन्ही बाजूंनी वहानच वहानं व पर्यटक खचाखच गर्दीने भरलेले होते. देश विदेश पर्यटक बरोबरच जिल्ह्यांतून पर्यटक प्रचंड गर्दी करून होते.पर्यटन बरोबरच पावसाचा ही मौजमजा पर्यटक घेताना दिसले परंतु लेण्यात पाण्याचा धबधबा सुरु झाल्याने पर्यटकांचा आकर्षण ठरत आहे हे विशेष.

# भोकरला कृषी दिनानिमित्त विविध ठिकाणी वृक्षारोपण

आधुनिक केसरी न्यूज



**भोकर :** केवळ झाडे लावायचीच नसून ती जगली पाहिजे हाच हेतू साध्य करण्यासाठी सावली प्रतिष्ठानच्या वतीने सोमवारी ता.(एक) कृषी दिनानिमित्त शहरातील विविध ठिकाणी वृक्षारोपण करण्यात आले आहे. शहरासह ग्रामीण भागात देखील वृक्षारोपण करून ती जगली पाहिजे यासाठी मागील ४ वर्षापासून सावली प्रतिष्ठान वृक्षारोपणाचे काम करते आहे. त्याच वृक्षाच्या शितल सावलीत अनेक जण विसावा घेताना दिसून येत आहे.उपविभागीय अधिकारी प्रवीण मेंगसेट्टी,तहसीलदार सुरेश घोळवे यांनी अशा विधायक उपक्रमांना चालना देऊन सहकार्य केले त्यामुळे कृषी दिनाचे औचित्य साधून येथील संत नामदेव महाराज मंदिराच्या मोकळ्या जागेत ,राष्ट्रसंत तुकडोजी महाराज आश्रम व स्मशानभूमी या ठिकाणी विविध जातींच्या रोपांचे वृक्षारोपण करण्यात आले. ग्रामीण रुग्णालयाकडे जाणाऱ्या रस्त्याच्या कडेला अंगणवाडीच्या बाजूला मोकळ्या जागेत सुद्धा वृक्षारोपणासाठी जागा तयार करण्यात आली आहे तिथे लवकरच वृक्षारोपण करण्यात येणार आहे. यावेळी सावली प्रतिष्ठानचे अध्यक्ष बी.आर. पांचाळ, उपाध्यक्ष बाबुराव पाटील, नगर परिषदेचे कर्मचारी जावेद इनामदार, साहेबराव मोरे, संत नामदेव महाराज समितीचे अध्यक्ष गणेश श्रीरामवार कोषाध्यक्ष जनार्दन पोटपल्लेवार, गणेश मगीरवार, अनिल मगिरवार, राजू दांडगे यांची उपस्थिती होती. भोकर विचार विकास मंच, सेवा समर्पण परिवार,एक झाड एक वृक्ष मित्र मंडळ यांच्या वतीने देखील वृक्षारोपणास सुरुवात करण्यात आली आहे.

# चक्क जिप्सी चालकाच्या शर्टात निघाला साप

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पात जिप्सी चालकाच्या शर्टात साप निघाला. सुदैवाने तो बिनविशारी साप असल्याने जिप्सी चालकाचा जीव वाचला. अन्यथा अनर्थ झाला असता.ताडोबा – अंधारी व्याघ्र प्रकल्पाला सोमवार १ जुलै पासून पावसाळी सुटी लागत आहे. पावसाळ्यात ताडोबा कोर झोन मधील पर्यंटन पूर्णपणे बंद असते. प्रकल्प तीन महिन्यांसाठी बंद होणार असल्याने शनिवार व रविवार असे दोन दिवस पर्यटकांची चांगलीच गर्दी ताडोबात होती. अशातच शनिवार २९ जून रोजी ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पाच्या जिप्सी चालकाच्या शर्ट मध्ये निघाला साप निघाला. ताडोबाच्या कोलारा गेट परिसरातील ही घटना आहे. जिप्सी चालक प्रमोद गायधने हे शनिवारी सकाळी सफारी साठी तयारी करत होते. तयारी करतांना शर्ट घातल्यावर त्यांना शर्टाच्या आत काहीतरी वळवळ जाणवली. त्यांना वाटले शर्टाच्या आत काहीतरी दोरी किंवा अन्य काही फसले असावे. मात्र त्यांनी बघितले असता तिथे मोठा साप त्यांना दिसला.

# क्षीरसागर यांचे समर्पण आणि त्याग मोलाचा : रावसाहेब म्हस्के

आधुनिक केसरी न्यूज



**श्रीरामपूर :** रयत सेवकाची रयतनिष्ठा व विद्यार्थीनिष्ठा हा जीवनातील अनमोल ठेवा आहे. विद्यार्थी घडविण्यात आणि शाखेची गुणवत्ता वाढविण्यात शिक्षकांचे अथक परिश्रम आहे. याच परिश्रमाचा परिपाक म्हणजे क्षीरसागर यांचे समर्पण आणि त्याग मोलाचा आहे, असे प्रतिपादन जनरल बॉडी सदस्य रावसाहेब म्हस्के यांनी केले. प्रवरानगर येथील महात्मा गांधी शैक्षणिक संकुलात कनिष्ठ विभागातील मेकॅनिकल विषयाचे निदेशक राजेंद्रकुमार क्षिरसागर यांच्या सेवापूर्ती समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जनरल बॉडी सदस्य रावसाहेब म्हस्के हे होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून माजी सहसचिव संजय नागपुरे, माजी प्राचार्य अण्णासाहेब साबळे व माजी नगराध्यक्ष बंडू पैलवान क्षिरसागर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला प्रमुख पाहुणे व अध्यक्ष यांच्या हस्ते कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागत प्राचार्य अंगद काकडे यांनी केले. यावेळी मुख्याध्यापिका सिंधू क्षेत्रे, मुख्याध्यापक राजेंद्र बडे, मधुकर अनाप, व्ही.टी. गायकवाड, चंदूभाई तांबोळी, रतिलाल भंडारी, नारायण जाधव, रामचंद्र डोळे, गोरक्षनाथ फटांगरे, के.डी. भगत, नानासाहेब गांगड, संपत तांबे, नंदकुमार मोरे, प्रशांत पाटील, हरिभाऊ चौधरी, भागवत कुटे, सुभाष भुसाळ, संजय ठाकरे, बाबासाहेब अंत्रे, प्राचार्य बाळासाहेब अंबाडे, आई विमल क्षिरसागर, मुलगी शिवानी क्षिरसागर, अशोक निंबाडे, संजीवनी आंधळे, तळपाडे, काळे, नळे यांच्यासह अनेक आजी-माजी शिक्षक, मुख्याध्यापक, नातेवाईक उपस्थित होते. याप्रसंगी राजेंद्रकुमार क्षिरसागर उभयतांचा शाखेच्यावतीने मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. शाखेच्यावतीने देण्यात येणाऱ्या मानपत्राचे वाचन रेणुका वर्पे यांनी केले. यावेळी नितीन हुसळे, गोरक्षनाथ बनकर, साधना घोगरे, मुलगा आदित्य क्षिरसागर, बंडू क्षिरसागर, छाया क्षिरसागर, प्रियंका काखी, अजय भांडीक, संगीता वाव्हळ, तेजस भोसले, पत्नी सीमा क्षिरसागर, राजेंद्रकुमार क्षिरसागर यांनी आपले मनोगत व्यक्त केले. संजय नागपुरे यांनी आपल्या भाषणातून विद्यार्थी घडविण्यात शिक्षकांचे परिश्रम आणि ध्यास महत्त्वाचा असून जीवनाचा तोच सर्वोच्च आनंद असल्याचे मत व्यक्त केले. आणि क्षिरसागर कुटुंबीयांना शुभेच्छा दिल्या. अध्यक्षीय भाषणातून रावसाहेब म्हस्के यांनी रयत ही त्यागातून उभी राहिलेली संस्था असून विद्यार्थी घडविण्यात शिक्षकांचे जीवन समर्पित आहे, असे मत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रतिभा ठोकळ, अश्विनी सोहोनी यांनी केले, तर शेवटी उपप्राचार्या अलका आहेर यांनी आभार मानले.

# पालकमंत्री राठोड यांच्या वाढदिवस; धरमसिंग चव्हाण यांच्याकडून फळवाटप

आधुनिक केसरी न्यूज

**जामनेर :** तालुक्यातील फत्तेपूर येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात पालकमंत्री संजय राठोड यांच्या वाढदिवसानिमित्त रुग्णांना सोयगाव पंचायत समितीचे माजी सभापती धरमसिंग चव्हाण यांनी फळे वाटप केले. जिल्ह्याचे पालकमंत्री संजय राठोड यांच्या वाढदिवसानिमित्त दिग्रस, दारव्हा, नेर येथे आरोग्य संकल्प अभियानांतर्गत माँ आरोग्य सेवा समिती व आचार्य विनोबा भावे ग्रामीण रुग्णालय सावंगी (मेघे) यांनी घेतलेल्या आरोग्य शिबिरात तीन तालुक्यांत एकूण 5,460 रुग्णांची तपासणी करण्यात आली. यातील गंभीर आजार असलेल्या 2,297 रुग्णांवर पुढील उपचार सावंगी (मेघे) येथे करण्यात येणार आहेत.अशी माहिती सभापती चव्हाण यांनी फत्तेपूर येथे रुग्णांना दिली

ते पुढे म्हणाले की शासकीय रुग्णालयात अनेक आजारांवर मोफत उपचार केले जातात. मात्र कर्करोग, किडनी, मेंदुविकार व इतर गंभीर आजारांवरील उपचार महागडे व खर्चिक असतात. मतदारसंघातील नागरिकांचा अशा महागड्या आजारांवरील उपचारासाठी एक रुपयासुद्धा खर्च होऊ नये. त्यांच्यावर सर्व उपचार मोफतच व्हावे, यासाठी दर सहा महिन्यांनी पालकमंत्री राठोड यांच्यामार्फत आरोग्य शिबिर घेतले जाते. या अभियानांतर्गत दिग्रस 9 जून, नेर 15 जून व दारव्हा येथे 22 जून रोजी हे मोफत आरोग्य तपासणी, उपचार, शस्त्रक्रिया व औषध वितरण शिबिर घेण्यात आले. या शिबिरात तिन्ही तालुक्यांत नेत्ररोग, मेडिसिन, बालरोग, शल्यचिकित्सा, स्त्रीरोग, अस्थिरोग, कान, नाक, घसा, त्वचारोग, श्वसनरोग, दंत व मुख रोग, मानसिक विकार,



हृदयरोग, मूत्ररोग, मेंदुविकार, प्लॅस्टिक सर्जरी, रेडिओलॉजी आणि कर्करोग अशा विविध रुग्णांचा समावेश होता.

उपचार, विविध तपासण्या, औषधी आणि येणेजाणे व जेवणाचा सर्व खर्च पालकमंत्री संजय राठोड करणार आहेत.सावंगी येथे उपचारासाठी जाणाऱ्या रुग्णांची कोणतीही गैरसोय होऊ नये यासाठी संजय राठोड यांचे रुग्णसेवक ठिकठिकाणी तत्पर आहेत. गंभीर आजारांवरील उपचारांचा खर्च पालकमंत्री संजय राठोड हे वैयक्तिकपणे करत असल्याची माहिती सभापती धरमसिंग चव्हाण यांनी फळे वाटप करताना रुग्णांना सांगितले त्यामुळे रुग्णांना व नागरिकांना मोठा दिलासा मिळत आहे.याप्रसंगी फत्तेपूर येथील वैद्यकीय अधिकारी डॉ शादेक काद्री, डॉ सागर पाटील, डॉ किरण धनगर, आरोग्य सेवक सुनील पाटील, प्रविण मोरे, कविता वाहुळे,कालिंदा सानप, मैना वकटे, मनिषा वाकोडे, मनिषा शेळके, संगिता चौधरी व इतर कर्मचारी उपस्थित होते.

# उत्कृष्ट कार्याबद्दल पत्रकार सुभाष शेटे 'महाराष्ट्र भूषण' पुरस्कार

## युवा क्रांती पोलीस मित्र संघटनेचे अध्यक्ष रविंद्र सूर्यवंशी यांच्याकडून दखल

आधुनिक केसरी न्यूज

**कवठे येमाई :** मागील १५ ते २० वर्षांपासून आपल्या



लेखणीतून विविध सामाजिक प्रश्नांची समाजमाध्यम व विविध वृत्तपत्रातून मुद्देसूद मांडणी करीत सोडवून व्हावी म्हणून प्रामाणिकपणे प्रयत्न करणारे तसेच युवा क्रांती पोलीस मित्र संघटनेच्या माध्यमातून पुणे जिल्ह्यात उत्कृष्ट संघटन वाढ करणारे शिरूर तालुक्यातील कवठे येमाई येथील जेष्ठ पत्रकार,कुशल संघटक तथा युवाक्रांती पोलीस मित्र, ग्राहक, पत्रकार संरक्षण, माहिती अधिकार संघटनेचे महाराष्ट्र प्रदेश मुख्य प्रसिद्धीप्रमुख,वरिष्ठ मार्गदर्शक प्रा.सुभाष शेटे यांना भारत सरकारकडे नोंदणीकृत असलेली युवाक्रांती पोलीस मित्र, ग्राहक, पत्रकार संरक्षण,माहिती अधिकार संघटनेच्या वतीने ते संघटनेच्या माध्यमातून करीत असलेल्या उत्कृष्ट संघटन, मार्गदर्शन कार्याबद्दल संघटनेचे संस्थापक अध्यक्ष रविंद्र सूर्यवंशी यांनी आज एक जुलैला शेटे यांना महाराष्ट्र भूषण पुरस्कार जाहीर केला आहे. याबाबतची अधिकृत घोषणा ही सूर्यवंशी यांनी केली आहे.

आजपर्यंत कवठे येमाई परिसरासह शिरूरच्या पश्चिम भागातील हजारो लोकांच्या विविध समस्या विनाशर्त सोडविण्याचे व अडचणीत असलेल्या लोकांना मदत मिळवून देण्याचे काम पत्रकार शेटे अण्णा करीत आहेत. युवा क्रांती संघटनेच्या माध्यमातून ही पत्रकार शेटे शिरूर तालुक्या सह पुणे जिल्ह्यात संघटन वाढ व मार्गदर्शन करण्याचे काम करीत आहेत. त्यांच्या याच कामाची दखल घेत त्यांना आज दि. १ जुलैला महाराष्ट्र भूषण पुरस्कार जाहीर झाला. हा पुरस्कार लवकरच समारंभपूर्वक व सन्मानपूर्वक शेटे अण्णा यांना प्रदान करण्यात येणार असल्याची माहिती संघटनेचे अध्यक्ष रविंद्र सूर्यवंशी यांनी दिली.  पत्रकार शेटे अण्णा यांना आज महाराष्ट्र भूषण पुरस्कार जाहीर झाल्याबाबद्दल राज्याचे सहकार मंत्री ना.दिलीपराव वळसे पाटील,शिरूरचे माजी आमदार पोपटराव गावडे,संघटनेचे राष्ट्रीय पदाधिकारी डॉ. राजेश्वर हेंद्रे,जयश्रीताई अहिरे,शिवाजीराव शेलार,सुरेश गायकवाड,अंकुशराव आगरकर,संगीता रोकडे,वैशाली बांगर,मीना गवारे,मंगल सासवडे,अंकुश घारे,विलास रोहिले,पुणे जिल्हा व शिरूर तालुक्यातील संघजटनेचे विविध पदाधिकारी व सदस्य तसेच कवठे येमाई ग्रामस्थांनी अभिनंदन केले आहे.



# दुय्यम निबंधक कार्यालयात वृक्षारोपण

आधुनिक केसरी न्यूज

**जळगाव जा :** कृषी दिनानिमित्त येथील दुय्यम निबंधक कार्यालयाच्या आवारात विविध जातीच्या वृक्षारोपण करण्यात आले. येथील दुय्यम निबंधक अधिकार अमोल भागवत यांनी कार्याल्याच्या आवारात कृषी दिनानिमित्त छोटे खाणी कार्यक्रम आयोजित करून वृक्षां बाबत माहिती देऊन वृक्षाचे कशा प्रकारे संवर्धन करून त्या पासून मिळणारे फायदे या बाबत मार्गदर्शन केले व विविध प्रकारच्या जातीचे वृक्षारोपण केले यावेळी दुय्यम निबंधक अधिकारी अमोल भागवत, तसेच कर्मचारी निलेश खापरे, बोरसे यांच्यासह आदींची उपस्थित होती.



# मोकाट गुरांचा बंदोबस्त करण्यासाठी निवेदन!

आधुनिक केसरी न्यूज

**पहूर :** ता. जामनेर शेतशिवारासह बस स्थानक परिसरातील मोकाट गुरांचा बंदोबस्त करण्यासाठी पहूर येथील शेतकरी वीरेंद्र संचालक लोढा यांच्यासह शेतकऱ्यांनी पहूर पेठ ग्रामपंचायतीचे उपसरपंच शरद पांढरे यांना आज शनिवारी दि . २९ जून २०२४ रोजी लेखी निवेदन दिले. निवेदनात म्हटले आहे की , शेत शिवारात मोकाट गुरांचा सुळसुळाट झालेला आहे. शेतातील उभी कोवळी पिके मोकाट गुरे फस्त करत असल्याने शेतकऱ्यांना मोठा आर्थिक फटका बसत आहे . या गुरांचा बंदोबस्त करण्यात यावा अशी मागणी वीरेंद्र संचालाल लोढा यांनी केली असून या निवेदनावर प्रवीण सुवालाल लोढा , राजू प्रल्हाद पाटील , अशोक पंढरीनाथ पाटील यांच्यासह शेतकरी बांधवांच्या सह्या आहेत आहेत. मोकाट गुरांचा बंदोबस्त करण्यात यावा , मागणीचे निवेदन आज शनिवारी वीरेंद्र लोढा यांनी  पहूर पेठ ग्रामपंचायतीचे उपसरपंच शरद पांढरे यांना दिले. तसेच ग्रामपंचायत कार्यालयात निवेदन देण्यात आले असून त्याच्या प्रती जिल्हाधिकारी जळगाव, मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद जळगाव,  तहसीलदार जामनेर व गटविकास अधिकारी जामनेर यांना देण्यात येणार असल्याचे वीरेंद्र लोढा यांनी सांगितले.

# विद्यार्थ्यांची लूट थांबवा; अन्यथा शिवसेनास्टाईल आंदोलन

## युवा सेनेचा शिक्षण अधिकाऱ्यांना इशारा

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** महाविद्यालयीन प्रवेश प्रक्रियेतील विद्यार्थींची आर्थिक लूट त्वरीत थांबवा अन्यथा शिवसेना स्टाईल मधे आंदोलन करू धुळे जिल्हा युवासेना विस्तारक शंभू बागुल यांचा इशारा युवा सेनातर्फे शिक्षण अधिकारी यांना निवेदन देण्यात आले यात असे म्हटले आहे की इयत्ता १२ वीचे निकाल लागून २-३ आठवड्यांचा कालावधी झाला आहे. विद्यार्थ्यांची महाविद्यालयीन प्रेवेश प्रक्रिया अंतिम टप्यात आहे. मात्र धुळ्यातील अनेक महाविद्यालये प्रेवशासाठी डोनेशन च्या नावाने मोठ्या प्रमाणावर विद्यार्थ्यांची आर्थिक लूट करीत आहेत याबाबत विद्यार्थ्यांच्या धुळे जिल्हा युवासेनेच्या पदाधिकारींकडे व युवासैनिकांकडे तक्रारी आल्या आहेत. अनेक महाविद्यालयांकडून केवळ १ किंवा २ मेरीट लिस्ट प्रसिध्द करण्यात आल्या आहेत. उर्वरीत ॲडमिशनच्या प्रक्रियेत मात्र महाविद्यालयांच्या प्रशासनाकडून अथवा संस्थाचालकांकडून डोनेशन च्या नावाने हजारो रूपये मागून विद्यार्थांचे आर्थिक शोषण होत असल्याचा गंभीर प्रकार उघडकीस आला आहे. यामुळे सर्वासाधारण आर्थिक परिस्थिती असलेल्या विद्यार्थ्यांना मोठ्या समस्येला तोंड द्यावे लागत आहे. अनेक पात्र विद्यार्थांवर गुणवत्ता असतांनाही चांगल्या



महाविद्यालयात प्रवेश न मिळाल्याने मोठा आन्याय होणार आहे. तसेच प्रवेश प्रक्रियेत पारदर्शक्ता नसल्याने सर्वसामान्य अथवा आर्थिक परीस्थितीत नसलेल्या विद्यार्थ्यांवर संस्थाचालकांकडून आर्थिक लूट केली जात आहे. धुळे जिल्हा युवासेना विद्यार्थ्यांच्या न्याय हक्कासाठी नेहमीच लढा देत आली आहे. प्रेवश प्रक्रियेतील विद्यार्थ्यांची आर्थिक लूट म्हणजे धुळ्यातील शिक्षण व्यवस्था अस्थिर करण्याचा प्रयत्न होत आहे. या प्रकार वाढला तर याचे दुरगामी दुषपरीणाम संपुर्ण धुळे जिल्ह्यातील नागरीकांना भोगावे लागणार आहे. शासनाची यंत्रणा व्यवस्थित काम करीत नसल्यानेच असे प्रकार घडू लागले आहे असे या ठिकाणी सांगण्यात आले. त्यामुळे यावर तातडीने उपाययोजना होणे गरजेचे आहे. तसे न झाल्यास धुळे जिल्हा युवासेना विद्यार्थ्यांच्या न्याय हक्कासाठी रस्त्यावर उतरून तीव्र स्वरूपाचे आंदोलन करेल असा इशारा निवेदना द्वारे धुळे जिल्हा शिक्षण आधिकारी यांना देण्यात आला. सदरहू निवेदन धुळे जिल्हा विस्तारक शंभूजी बागुल यांच्या नेतृत्वात देण्यात आले. युवासेना कार्यकारणी सदस्य प्रियंका जोशी, धुळे जिल्हा विस्तारक शंभू बागुल, युवासेना जिल्हा प्रमुख हरिष माळी, उपजिल्हा प्रमुख कुणाल कानकाटे, युवती विस्तार सोनी सोनार, छत्रपाल पारधी, अनिकेत बोरसे, मनोज जाधव, शिद्धार्थ करंकाळ, मोहित वाघ, सिद्देश नाशिकर, प्रियजीत पवार सौरभ लहमगे, जयेश फुलपगारे, शुभम फुलपगारे, युवासेना पदाधिकारी, युवासैनिक मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते.

# तलाठ्यावर कडक कारवाईसाठी उपोषण करणार

## महसुली अधिकाऱ्यांच्या मनमानीमुळे शेतकरी न्यायापासून वंचित ?

आधुनिक केसरी न्यूज

**सुधाकर जेठे**

**फुलंब्री :** तालुक्यातील बाबरा येथील महमंद सय्यद नूर सय्यद रा. बाबरा, हे फुलंब्री तहसिल कार्यालयातील तलाठी (सजा बाबरा), मंडळ अधिकारी (बाबरा) व तहसिलदार फुलंब्री यांच्या दुर्लक्षीत पणामुळे अनेक वर्षांपासून न्याय मिळत नसल्यामुळे व त्यांच्या त्रासाला कंटाळुन अमरण उपोषण करत असून संबधित तलाठी, मंडळ अधिकारी यांची तात्काळ चौकशी करून निलंबनची कार्यवाही करून मला न्याय मिळावा असे निवेदनात म्हटले आहे.

मौजे बाबरा, ता. फुलंब्री, येथील जमीन गट नंबर १५१ मधील त्यांच्या मालकी व ताब्यातील विहीरीचा फेरफार घेण्यासाठी तहसिल कार्यालय फुलंब्री येथे दिनांक ०२/१२/२०२२ रोजी फेरफार घेण्यासाठी भावाने व वडीलांनी माझ्या उप-विभागीय अधिकारी यांच्याकडे अर्ज केला होता. अर्ज करण्यापूर्वी मी माझ्या विहीरीचा माझ्या पश्श्चात घेतलेला चुकीचा फेरफार क्रमांक ३४३२ रद्द करण्यासाठी उपविभागीय अधिकारी यांचेकडे अपील दाखल केले व उपविभागीय अधिकारी साहेबांनी सदर फेरफार रदद करण्याचे आदेश दिले असता त्यानंतर माझ्या भावाने व वडीलांनी अप्पर जिल्हाधिकारी साहेबांकडे अपील दाखल केले, अप्पर जिल्हाधिकारी साहेबांनी उपविभागीय अधिकारी साहेबांचा आदेश रदद करण्याचा आदेश केला असता, मी सदर आदेशाविरुध्द विभागीय आयुक्ताकडे रिव्हीजन दाखल केला . सदर रिव्हीजन अर्जाचा निकाल माझ्या बाजुने लागला व उपविभागीय अधिकारी पैठण फुलंब्री यांचा आदेश कायम करण्यात आला. यानंतर मी वर नमुद केल्याप्रमाणे सदर आदेशान्वये माझ्या नावे फेर घेण्यासाठी अर्ज केला, माझ्या दिनांक ०२/१२/२०२२ रोजीच्या अर्जाच्या अनुषंगाने तहसिलदार साहेबांनी तलाठी सजा बाबरा यांना दिनांक ११/१०/२०२३ रोजी आदेशीत केले तरीही तलाठी सजा बाबरा यांनी फेरफार घेण्यासंबंधी



कोणतीही कार्यवाही केली नाही, म्हणुन पुन्हा दिनांक ११/१२/२०२२ रोजी तहसिल कार्यालयातर्फे पत्र काढण्यात आले, तरीही तलाठी व मंडळ अधिकारी यांनी कोणतीही कार्यवाही केली नाही. दिनांक ०८/०१/२०२४ रोजी तलाठी सजा बाबरा यांना स्मरणपत्र काढण्यात आले, तरीही मंडळ अधिकारी व तलाठी यांनी काहीही कार्यवाही केलेली नाही. मी वेळोवेळी तहसिलदार साहेबांना भेटुन फेरफार घेण्यासंबंधी व तलाठी व मंडळ अधिकारी यांना समजावुन सांगण्यासंबंधी विनंती केली . परंतु तहसिलदार साहेबांनी माझ्याकडे प्रत्येक वेळी दुर्लक्ष केले मी अनेकवेळा तलाठी, मंडळ अधिकारी व तहसिलदार साहेब यांना फोनवरून विनंती केली, परंतु त्यांनी माझ्या अर्जाची व विनंतीची कोणतीही दखल आजपर्यंत घेतलेली नाही.म्हणून न्याय मिळत नसल्यामुळे ४ जुलै २०२४ गुरुवार रोजी आपल्या कार्यालयासमोर मी अमरण उपोषण करणार आहे, माझ्या जिवीतास काही बरेवाईट झाल्यास केवळ आपणच सर्वस्वी जबाबदार असणार याची नोंद घ्यावी. असे निवेदन उपोषणकर्ता महमंद सय्यद नुर सय्यद रा बाबरा ता फुलंब्री यांनी तहसिलदार फुलंब्री यांच्यासह मा. उपविभागीय अधिकारी पैठण - फुलंब्री मा. जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय छ. संभाजीनगर मा. विभागीय आयुक्त कार्यालय छ. संभाजीनगर यासह मा. पोलीस निरीक्षक, पो स्टे फुलंब्री यांना दिले आहे

# बाजार सावंगी जिल्हा परिषद शाळेत रिक्त जागा भरण्याची मागणी

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** तालुक्यातील बाजार सावंगी येथील जिल्हा परिषद माध्यमिक शाळेत वर्ग पाचवी ते दहावी पर्यंत वर्ग असून प्राथमिक व माध्यमिक शिक्षकांचे वर्गीकरण देखील आहे. प्राथमिक विभागासाठी शासनाच्या 11 जागा मंजूर असून त्या अकरा जागा पूर्णपणे भरलेले असून शिक्षक कार्यरत आहेत. माध्यमिक शिक्षण विभागात आठवी ते दहावी साठी चौदा शिक्षकांच्या जागा मंजूर असून प्रत्यक्षात दहा शिक्षकांची नियुक्ती असल्याने चार जागी रिक्त असल्याने इतरांवर शिक्षणाचा ताण पडत आहे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये अभ्यास व शिक्षण व्यवस्थेत प्रगतीसाठी रिक्त जागा त्वरित भराव्यात अशी विद्यार्थी पालकांची मागणी आहे.

तसेच राजपत्रित मुख्याध्यापक एक जागा पर्यवेक्षक एक जागा लिपिक एक जागा अशा तीन जागा देखील रिक्तच आहेत शालेय व्यवस्थापनासाठी चतुर्थ श्रेणी कर्मचारी हायस्कूलमध्ये तीन जागा शासनातर्फे मंजूर असताना एकही जागा भरलेली नाही हायस्कूल असून सेवकच नसल्याने वर्ग व पटांगण स्वच्छता शालेय व्यवस्थापन दिवसभराचे कामकाज घंटा वाजवणे तासिका व मधली सुट्टी ही सर्व कामे सुरळीत करण्यासाठी सारखी तारांबळ उडते व कसे काम करावे हा प्रश्न सर्वांना पडतो सर्वांना कसरत करावी लागते. जिल्हा परिषद शिक्षण विभागातर्फे येथील शाळा आदर्श म्हणून घोषित असून सर्व रिक्त जागा त्वरित भरण्यात याव्या अशी पालक व विद्यार्थ्यांची मागणी आहे. सरपंचांनी अनेक वेळा जिल्हा परिषद शिक्षण विभागाकडे पाठपुरावा करून देखील सुधारणा झालेली नसल्याने येथील शाळेसाठी रिक्त जागा भरल्या जाव्या अशी सर्वांची आग्रहाची मागणी आहे.

# भरधाव कारची ट्रकला धडक; चार जण ठार

आधुनिक केसरी न्यूज

**यवतमाळ :** रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या रेतीच्या ट्रकला भरधाव कारने जोरदार धडक दिली. या अपघतात चार जण जागीच ठार, तर एक जण गंभीर जखमी झाला. हा अपघात आज सोमवारी पहाटे ५ वाजताच्या दरम्यान कळंब – यवतमाळ मार्गावर चापर्डा आणि घोटी गावाच्या दरम्यान झाला. चापर्डा गावाजवळ रेतीने भरलेला ट्रक ( क्र. एम.एच.३२-ए.जे.७७७३ ) यवतमाळच्या दिशेने रस्त्याच्या कडेला उभा होता. या ट्रकमध्ये कन्हान येथून आणलेली रेती नेली जात होती. दरम्यान, नागपूरवरुन यवतमाळकडे येणाऱ्या इनोव्हा कारने (क्र.पी.बी. ११-सी.बी.-४९६३) रेतीच्या उभ्या ट्रकला जोरदार धडक दिली. या गाडीमध्ये एकूण पाच जण प्रवास करीत होते. या अपघातात चालकासह चार जण जागीच ठार झाले. यामध्ये दोन पुरुष आणि दोन महिलांचा समावेश आहे. तर एक जण गंभीर जखमी असून त्याला तातडीने कळंब ग्रामीण रुग्णालयात भरती करण्यात आले. परंतु प्रकृती गंभीर असल्याने यवतमाळ येथे शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात पाठविण्यात आले. अपघात इतका भीषण होता की, इनोव्हा गाडी ट्रकच्या मागच्या भागात जाऊन अडकून पडली. एअर बॅग्सच्यासुद्धा चिंधड्या झाल्या. अपघाताची माहिती मिळताच कळंब पोलीस ठाण्याच्या निरीक्षक दीपमाला भेंडे यांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. मदतीसाठी गावकरी पुढे सरसावले. सर्व मृतक पंजाब राज्यातील असल्याची माहीती आहे. पोलिसांकडून नातेवाईकांशी संपर्क साधण्याचा प्रयत्न सुरू आहे. हे सर्व जण पंजाबमधून नांदेड येथे गुरुद्वारात दर्शनासाठी निघाले होते. रात्रभर सतत प्रवास केल्याने चालकाला डुलकी लागल्याने हा अपघात झाल्याची शक्यता पोलिसांनी वर्तविली आहे.



# खेडकर यांचे कार्य समाजाला दिशा देणारे; माजी आमदार रोहिदास चव्हाण

## मुख्याध्यापक वैजनाथ खेडकर यांचा सेवापुर्ती गौरव

आधुनिक केसरी न्यूज

**लोहा :** पदोन्नत मुख्याध्यापक वैजनाथ खेडकर यांचे ज्ञानदानाचे कार्य म्हणजे समाजाला दिशा देणारे आहे. शिक्षण क्षेत्रात एक नाविन्यपूर्ण कृतीशील शिक्षक, आदर्श मुख्याध्यापक म्हणून कर्तव्य बजावले, असे गौरवोद्गार सेवापूर्ती गौरव सोहळा कार्यक्रमात माजी आमदार रोहिदास चव्हाण यांनी काढले. नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झालेले मुख्याध्यापक वैजनाथ बाबुराव खेडकर यांचा सेवा पुर्वी सत्कार सोहळा (ता.२८) तालुक्यातील पोलीस वाडी येथील रेणुका देवी मंदिर सभागृहात संपन्न झाला. प्रसंगी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संभाजीराव धुळगंडे, उद्घाटक शिवसेना उबाठा लातूर जिल्हा संपर्कप्रमुख माजी आमदार रोहिदास चव्हाण, प्रमुख उपस्थिती माजी नगराध्यक्षा आशाताई चव्हाण, माजी जि. प. सदस्य चंद्रसेन पाटील, सरपंच यमुनाबाई बाजगीर, माजी सरपंच पिराजी धुळगंडे, गटशिक्षणाधिकारी सतीश व्यवहारे, केंद्रप्रमुख प्रशांत कोंडलवाडे, विठ्ठल आचणे केंद्र प्रमुख, बाबुराव फसमले, डी. आर. शिंदे,पाराजी पोले, धावरी चे मुख्याध्यापक बी वाय चव्हाण, धोंडू किलजे, ज्ञानोबा कोरडे, बापू गायकर, ज्ञानोबा घोडके, विजय तेललवार, रावण वाघमारे, जी. वाय. वाघमारे,आदींची उपस्थिती होती. प्रथमता मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. अनेकांनी आपलं मनोगत व्यक्त केले. पुढे बोलताना माजी आमदार रोहिदास चव्हाण म्हणाले की, वैजनाथ खेडकर सरांनी ज्ञानदान करताना विद्यार्थ्यांना आपले दैवत मानून जीव ओतून आयुष्यभर विद्यार्थ्यांना घडविण्याचे काम केले. ज्ञानदानाच्या कामात कधीच कुचराई केली नाही. खेडकर सरांचे व्यक्तिमत्व म्हणजे अतिशय प्रामाणिक, अभ्यासू,जिद्दी चिकाटीचे असून सरांचा आदर्श शिक्षण क्षेत्रातील गुरुजींनी घेऊन देशातील भावी पिढ्या निर्माण केल्या असे प्रतिपादन साहित्यिक बापू गायकर यांनी केले.

सत्कार ला उत्तर देतांना मुख्याध्यापक खेडकर भावनाविवश झाले. त्यांनी आयुष्यातील आलेले अनुभव प्रसंग सांगितले. उपस्थित सर्व शिक्षण क्षेत्रात सह राजकीय क्षेत्रातील मान्यवरांचे विशेष आभार मानले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शंकर गायकवाड यांनी तर आभार प्रदर्शन नागेश स्वामी यांनी केले.

# मनोज पवार यांच्यातर्फे गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान सोहळा संपन्न

## पंधरा जुलैपासून रोजगार संधी उपलब्ध करून देईल : मनोज पवार

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** येथे राजुरेश्वर कार्यलयात इयत्ता दहावी आणि बारावीला गुणानुक्रमे प्रथम आलेल्या पहिल्या विद्यार्थ्यांचा सन्मान सोहळा आयोजित करण्यात आला . विद्यार्थी हा आपल्या देशाचा आधार आहे. या विद्यार्थ्याला प्रेरणा देण्यासाठी त्याचा सन्मान होणे गरजेचे आहे, ही बाब हेरून उद्योजक तथा समाजसेवक मनोज केशवराव पवार यांच्या वतीने ह्या सन्मान सोहळ्याचे आयोजन करण्यात आला. सोमवार दिनांक 1 जुलै सकाळी 11:00 वा. कन्नड येथील राजुरेश्वर मंगल कार्यालयात हा समारंभ पार पडला. यासाठी कन्नड-सोयगाव विधानसभा मतदारसंघातील विद्यार्थ्यांनी तसेच पालकांची मोठी उपस्थीती होती. प्राप्त गुणपत्रकांतून गुनानुक्रमे इयत्ता दहावीतील आणि इयत्ता बारावीतील प्रत्येकी पहिल्या शंभर विद्यार्थ्यांचा सन्मानचिन्ह आणि प्रत्येकी पहिल्या तीन विद्यार्थ्यांचा सन्मानचिन्हासह रोख रक्कम देऊन सत्कार करण्यात आला. यानिमित्ताने 'घे उंच भरारी' या विषयावर लेखक तथा व्याख्याते प्रा. डॉ. संजय गायकवाड यांनी प्रबोधन केले व लेखाधिकारी शरद भिंगारे यांनी विदयार्थी यांना मार्गदर्शन केले. यावेळी उदयोजक मनोज पवार बोलताना म्हणाले कन्नड तालुक्या मध्ये मोठया प्रमाणात बेरोजगार आहेत शिक्षण घेऊन सुद्धा ते बेरोजगार दिसुन येत आहेत म्हणुनच या तालुक्यात उच शिक्षण कॉलेज असावे व त्यातुन शिक्षण घेऊन बाहेर पडण्याऱ्यां विद्यार्थीना मि विविध कंपनीच्या वरीष्ठ अधिकारी यांना बोलावुन तालुक्यातील विदयार्थीना रोजगार उपलब्ध करून देणार आहे. लवकर येत्या 15 जुलै पासुन नोकर भरती सुरु करणार असे ही अश्वासन उदयोजक मनोज पवार यांनी सांगीतले. या कार्यक्रमा




वेळी निवृत्त शिक्षणाधिकारी डॉक्टर टी. पी. पाटील, डॉ. मिलिंद पाटील, टी. एस. कदम, जिल्हा परीषद सदस्य किशोर पवार, भाजपाचे उत्तमराव राठोड, माजी नगर सेवक अहमद अली, जिजामाता शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव सागर जाध, विनायकराव पाटील विदयालयाचे उप प्राचार्य संतोष मतसागर, रंगनाथ लहाणे, अरविंद कांबळे यांची विशेष उपस्थितीथीत पुरस्कारार्थी विद्यार्थ्यांना सन्मान चिन्ह व रोख रक्कम पारीतोषीके देण्यात आले.



# प्रा. सायली लाखे पिदळी यांचा करियर कट्टाद्वारा सन्मान

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** जिल्ह्यातील बोखरा स्थित रामकृष्ण वाघ कॉलेज ऑफ आर्ट्स अँड कॉमर्स येथील करियर कट्टा महाविद्यालयीन समन्वयक तथा मराठी विभाग प्रमुख प्रा. सायली लाखे पिदळी यांना नुकतेच करियर कट्टाद्वारे सन्मानित करण्यात आले. महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्रशिक्षण विभाग व महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र आणि नेस वाडिया कॉलेज, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करिअर कट्टा विशेषांक प्रकाशन सोहळा 28 जून 2024 रोजी पुणे येथे नुकताच पार पडला. याप्रसंगी व्यासपीठावर समारंभाचे अध्यक्ष मा. डॉ. शैलेंद्र देवळाणकर (संचालक, उच्च शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन), प्रमुख पाहुणे मा.डॉ.सचिन सानप (विश्वस्त, मॉर्डन एज्युकेशन सोसायटी, पुणे), मा. डॉ. वृषाली रणधीर (प्राचार्या नेस वाडिया कॉलेज, पुणे), महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र मा. अध्यक्ष यशवंत शितोळे, मा. प्राचार्य डॉ. दिनानाथ पाटील (अध्यक्ष राज्यस्तरीय प्रकाशन संपादकीय समिती), मा. डॉ. प्रभाकर घोडके ( सचिव, राज्यस्तरीय प्रकाशन संपादकीय समिती), प्रा. सायली लाखे पिदळी( सदस्य, राज्यस्तरीय प्रकाशन संपादकीय समिती)मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचा प्रारंभ दीपप्रज्वलन व झाडाला जल अर्पण करून आणि महाराष्ट्र गीताने झाली.

या कार्यक्रमाचे निमित्ताने करिअर कट्टा विशेषांक 2024 ची विशेषांक संपादनाची जबाबदारी उत्तमरीत्या पार पाडल्याबद्दल मा. प्राध्यापक सायली लाखे पिदळी (सदस्य , राज्यस्तरीय प्रकाशन संपादकीय समिती ) यांचा मान्यवरांच्या शुभहस्ते सत्कार करण्यात आला. प्राध्यापक वृंदांच्या आणि विद्यार्थ्यांच्या प्रचंड उत्साहात दिमाखदार आणि अभ्यासपूर्ण असा हा विशेषांकाचा प्रकाशन सोहळा यशस्वीरित्या पार पडला. प्रा. सायली लाखे पिदळी यांच्या पुणे येथील भव्य कार्यक्रमात झालेल्या सत्काराबद्दल त्यांच्यावर सर्वत्र कौतुकाचा वर्षाव होत आहे. रामकृष्ण वाघ कॉलेज ऑफ आर्ट्स अँड कॉमर्सच्या मराठी विषयाच्या प्राध्यापिका तथा करिअर कट्टा महाविद्यालयीन समन्वयक प्रा. सायली लाखे पिदळी यांनी याबाबत संस्थेचे संचालक मा. डॉ. मारोती वाघ, संचालिका मा. सौ. लता वाघ आणि प्राचार्या डॉ.अर्चना कहाळे पत्की व विशेषत्वाने करिअर कट्टा परिवाराचे मनापासून आणि कृतज्ञतापूर्वक आभार व्यक्त केले आहेत .

# नगरपालिका कर्मचारी संघटनेच्या मराठवाडा अध्यक्षपदी बलभीम शेंडगे बिनविरोध

आधुनिक केसरी न्यूज



**मुखेड :** महाराष्ट्र राज्य नगर परिषद कर्मचारी/ संवर्ग कर्मचारी संघटना मराठवाडा अध्यक्षपदी बलभीम शेंडगे यांची बिनविरोध निवड श्रीराम मंगल कार्यालय खोपोली जि. रायगड येथे नुकतीच करण्यात आली. माजी अध्यक्ष मारोती गायकवाड हे सेवानिवृत्त झाल्यामुळे मराठवाडा अध्यक्ष पद रिक्त होते. रायगड जिल्ह्यातील श्रीराम मंगल कार्यालय खोपोली येथे नुकतीच राज्य स्तरीय सर्वसाधारण सभेचे आयोजित करण्यात आले होते. त्यात मुखेड येथील कर्मचारी जिप्सीभूषण बलभीम शेंडगे यांची राज्याध्यक्ष सुरेश पोस्तांडेल यांच्या सूचनेनुसार कोअरकमिटी सदस्य विश्वनाथ घुगे व माजी अध्यक्ष मारोती गायकवाड यांनी बलभीम शेंडगे यांची बिनविरोध निवड करत असल्याची घोषणा केली. यावेळी उपस्थितांनी बलभीम शेंडगे यांना अनुमोदन दिले. यापूर्वी बलभीम शेंडगे यांनी महाराष्ट्र राज्य नगर परिषद कर्मचारी/ संवर्ग कर्मचारी संघटना नांदेड जिल्ह्याचे अध्यक्ष पद अनेक वर्ष अत्यंत प्रभावीपणे सांभाळले. आपल्या कार्यकालात त्यांनी अनेक कर्मचाऱ्यांना न्याय मिळवून देण्याचे काम केले. या कार्याची दखल घेऊन राजाध्यक्ष सुरेश पोस्तांडेल यांनी बलभीम शेंडगे यांची मराठवाडा अध्यक्षपदी निवड केली. ही निवड अत्यंत विचारपूर्वक करत असल्याचे पोस्तांडेल यांनी शुभेच्छा संदेशात नमूद केले आहे. बलभीम शेंडगे यांचे राज्य कोषाध्यक्ष लालू सोनकांबळे, राज्य सरचिटणीस अनिल पवार, धर्माजी खिल्लारे, रामेश्वर वाघमारे, सतीश देशमुख, वैजनाथ स्वामी, मार्तंड वनंजे, जितेंद्र ठेवरे, बालाजी माळसापुरे, गणेश मदने, सुभाष मीरावार, दिलीप वाघमारे, शिंदे यांच्यासह तहसीलदार राजेश जाधव, मुख्याधिकारी आशितोष चिंचाळकर, मुखेड भूषण डॉ. दिलीपराव पुंडे, डॉ. अशोक कोरवार, डॉ. रामराव श्रीरामे, डॉ. पांडुरंग श्रीरामे, अभियंता उत्तम नारलावार, संतोष साबदे, शिवशंकर कुच्चेवाड, रफिक बागवान, अशोक इंद्राळे, तेजराव गायकवाड, गौरव जाधव, सुप्रभातचे अध्यक्ष लक्ष्मण पत्तेवार, अशोक कोत्तावार, दादाराव आगलावे, जय जोशी बालाजी तलवारे वैजनाथ दमकोंडवार राजेश भागवतकर, गोविंद पाटील, नामदेव श्रीमंगले, उमाकांत डांगे, ईश्वर फुलवळकर, पिराजी जगताप, परमेश्वर काचमोडे, पापुले नायगावकर, कैलास गायकवाड तसेच मुखेड व नांदेड जिल्ह्यातील कर्मचारी,मित्रमंडळींनी अभिनंदन केले.



# कृषीदिनाचे औचित्य साधून मुखेड पं.स. येथे वसंतराव नाईक यांच्या प्रतिमेचे पूजन!

## शेतीनिष्ठ शेतकरी, लाभार्थ्यांचा सत्कार

आधुनिक केसरी न्यूज

**मुखेड :** महाराष्ट्राच्या शेती क्षेत्राचे उद्धारकर्ते, हरितक्रांतीचे प्रणेते तथा महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्यमंत्री कै. वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त पंचायत समिती व कृषी विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने दि.१ जुलै रोजी मुखेड पं.स.कार्यालयात कृषीदीन शेतक-यांच्या उपस्थित साजरा करण्यात आला. यावेळी शेतीनिष्ठ शेतकरी व विविध योजनेतील लाभार्थ्यांचा शेतीविषय माहिती असलेला पुस्तकाचा संच, शाल, पुष्पहार देवुन कृषी विभागाच्या वतीने यथोचित सत्कार करण्यात आले.

या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी माजी पं.स. सदस्य जे.बी. कांबळे हे होते तर प्रमुख अतिथी म्हणुन रिपब्लिकन सेनेचे तालुकाध्यक्ष श्रावण नरबागे, कृषी पर्यवेक्षक एस.बी.भोसले, विस्तार अधिकारी धनाजी धर्मेकर, विस्तार अधिकारी पि.एन. गर्जे, पं.स. लेखा विभागाचे नरमीटवार, प्रभारी कृषीधिकारी चंपतराव शिंदे, एमआरईजीएस विभागाचे प्रशांत कुलकर्णी, शेतीनिष्ठ शेतकरी दिगांबर पाटील चिवळीकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमाची सुरूवात हरितक्रांतीचे प्रणेते तथा महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्यमंत्री कै.वसंतराव नाईक यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन दिपप्रज्वलनाने करण्यात आली., कार्यक्रमाप्रसंगी जे.बी. कांबळे, ए.बी.भोसले, श्रावण नरबागे, दिगांबर पाटील, धनाजी धर्मेकर यांनी माजी मुख्यमंत्री कै. वसंतराव नाईक यांच्या जिवनचरित्रावर प्रकाश टाकला. यावेळी कॉँग्रेस सेवा दलाचे अण्णासाहेब जाहीरे, सामाजिक कार्यकर्ते आतीराज कांबळे, ललीताबाई शिकारेकर, विनोद सोनकांबळे, संपतराव कुंभारे, पंढरी गवलवाड माकणीकर, तुळशीराम कबनुरकर, शोभाबाई, भुरे यांच्यासह तालुक्यातील शेतिनिष्ठ शेतकरी व विविध योजनेतील लाभार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रम यशस्वितेसाठी प्रभारी कृषी अधिकारी चंपतराव कदम, विस्तार अधिकारी धनाजी धर्मेकर सह पंचायत समिती व कृषी विभागाचे अधिकारी, कर्मचारी परिश्रम घेतले आहेत.सदर कार्यक्रमाचे सुत्रसंचलन व प्रस्तावना धनाजी धर्मेकर यांनी केले तर आभार चंपतराव शिंदे यांनी मानले.

# विजेच्या तार चोरणाऱ्या चौघांविरुद्ध गुन्हा दाखल; एक जण ताब्यात तर तिघे फरार

आधुनिक केसरी न्यूज

**मुखेड :** महावितरण कंपनीची एक हजार फूट लांबीची विजेची तार भंगार वाल्याच्या मदतीने पळविणाऱ्या चार चोरट्याविरुद्ध मुखेड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मुखेड तालुक्यातील मौजे बेटमोगरा शिवारातील बाबु नुकुलवार यांच्या शेतात महावितरण कंपनीच्या वतीने विज पुरवठा करण्यात आला आहे. त्यांच्या शेतात एक हजार फूट लांब असलेली विजेची तार जोडली होती हे लक्षात घेऊन परिसरातीलच असलेल्या तिन चोरट्यांनी ही तार पळविण्याचा कट रचला असून दि.२७ रोजी रात्री ८ च्या सुमारास तिन चोरट्यांनी नरसी येथील मुर्तुजा सय्यद या भंगार वाल्याशी संपर्क साधून त्याला बाबु नुकुलवार यांच्या शेतातकडे बोलावून घेतले.यादरम्यान चोरट्यांनी महावितरण कंपनीची तार तोडताना पाहून काही नागरिकांनी त्यांच्याकडे धाव घेतली मात्र चोरट्यांनी अंधाराच्या फायदा घेत भीतीने आपली मोटारसायकल एम.एच २६ डब्ल्यु ११९३ (स्प्लेंडर प्लस) व एम.एच २६ सी.एफ ५१३४ (होंडा शाईन) या दोन्ही मोटारसायकल सोडून तिघे जन तेथून पळ काढले होते तर भंगारवाल्याला गावकऱ्यांनी त्याच्या छोटा हत्ती एम.एच १४ ई.एम ५७७१ सहित दोन मोटारसायकली पकडून मुखेड पोलिसांच्या ताब्यात दिले.

याप्रकरणी महावितरणचे कनिष्ठ अभियंता बालाजी सुरवसे यांनी दिलेल्या तक्रारीवरून मुखेड पोलिसांनी चौघांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणाचा अधिक तपास पोलीस उपनिरीक्षक फड हे करीत आहेत.

# विधासभा निवडणुकीत महायुतीच बहुमत मिळवणार

## भाजपा मुंबई अध्यक्ष आ. आशिष शेलार यांचा विश्वास

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** आगामी विधानसभा निवडणुकीसाठी भारतीय जनता पार्टीची रणनीती ठरली असून महायुतीतील सहकारी पक्षांसोबत भाजपा लढणार आहे. सामान्य जनतेचा आशीर्वाद असल्याने विधानसभा निवडणुकीत महायुतीला बहुमत मिळेल, असा विश्वास भाजपा मुंबई अध्यक्ष आ.आशिष शेलार यांनी शनिवारी व्यक्त केला. भाजपा कोअर कमिटीच्या बैठकीनंतर झालेल्या पत्रकार परिषदेमध्ये आ.शेलार बोलत होते. यावेळी राष्ट्रीय सचिव पंकजा मुंडे, ज्येष्ठ नेते हर्षवर्धन पाटील आदी उपस्थित होते.आपल्या सर्व सहकारी मित्रपक्षांना साथीला घेऊन राज्य सरकारच्या अर्थसंकल्पातील योजनांना सामान्य जनतेपर्यंत नेण्यासाठी 10 जुलैपर्यंत अभियान राबविले जाणार आहे, असेही आ.शेलार यांनी सांगितले. भाजपा प्रदेश कार्यालयात शनिवारी झालेल्या कोअर कमिटी बैठकीला भाजपाचे महाराष्ट्राचे प्रभारी भूपेंद्र यादव आणि सहप्रभारी अश्विनी वैष्णव, राष्ट्रीय सहसहसंघटन मंत्री शिवप्रकाश, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे आदी उपस्थित होते. आ. शेलार यांनी सांगितले की, या बैठकीत आगामी निवडणुकीबाबत विस्तृत चर्चा झाली. या निवडणुका भाजपा मित्रपक्षांच्या साथीनेच लढविणार असून महायुतीच्या विजयाचा रोडमॅप तयार झाला आहे. राज्याचा अर्थसंकल्प हा महाराष्ट्रातील सर्वसामान्य माणसाला केंद्रबिंदू ठेवून मांडला असून सर्व घटकांचे हित साधण्याचा उत्तम प्रयत्न अर्थसंकल्पातून करण्यात आल्याचे आ.शेलार म्हणाले. शेतकरी, महिला, विद्यार्थी, युवा वर्ग अशा समाजातील सर्व घटकांच्या हितार्थ सर्वसमावेशक विकासासाठी मांडलेल्या अर्थसंकल्पाबाबत राज्य सरकारच्या आभिनंदनाचा ठरावही या बैठकीत झाल्याचे त्यांनी नमूद केले. 10 जुलै पर्यंत 288 विधानसभा मतदारसंघांमधील 700 हून अधिक मंडलांमध्ये सहकारी पक्षांसोबत प्रत्यक्ष जाऊन अर्थसंकल्पाच्या तरतुदींची विस्तृत माहिती जनतेला देण्यात येणार आहे तसेच अर्थसंकल्पाबाबत जनतेचा अभिप्राय घेण्यात येणार आहे असे ही आ.शेलार म्हणाले.



# पोलीस निरीक्षकाविरुद्ध मानवी हक्क आयोगाकडे तक्रार

## ब्रांच मॅनेजरवर कट रचून काढली होती धिंड

आधुनिक केसरी न्यूज



**धुळे :** काही दिवसांपूर्वी रिलायन्स इन्शुरन्स येथील महिला कर्मचारी सुवर्णा राजपूत यांनी रिलायन्स इन्शुरन्स असिस्टंट ब्रांच मॅनेजर नितीन पाटील हे त्रास देतात म्हणून शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांकडे धाव घेऊन तक्रार केली होती व त्या ठिकाणी शिवसेना (उबाठा)च्या काही महिला व पदाधिकारी यांनी नितीन पाटील यांना मारहाण करून त्यांची घटनास्थळापासून  तर आझाद नगर पोलीस स्टेशनपर्यंत धिंड काढली होती. या प्रकरणात कुठलेच सत्य नसून त्या हद्दीतील पोलीस स्टेशन येथे शिवसेनेचे पदाधिकारी व बँकेतील कर्मचारी त्यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करायला गेले परंतु त्यांची दखल न घेतल्यामुळे पीडित नितीन पाटील यांनी पोलीस निरीक्षक प्रमोद पाटील, धुळे तालुका पोलिस स्टेशन, धुळे आणि तत्कालीन सहकारी यांचेविरोधात मानवी हक्क आयोगाकडे तक्रार दाखल केली आहे. ऑफिसमधील महिला कर्मचारी सुवर्णा गोपालसिंग राजपूत हिस त्रास देतो असा आरोप करीत सुवर्णा गोपालसिंग राजपूत यांनी शिवसेना (उध्दव ठाकरे गट) यांचेकडे तक्रार दिली व नितीन पाटील हे ऑफिसमध्ये काम करीत असतांना त्यावेळी १) सुवर्णा गोपालसिंग राजपूत, २) कविता संजय चौधरी, ३) ऋषिकेश भिमराव पाटील, ४) शुभांगी भास्कर पाटील, ५) जयश्री अनिल वानखेडे, ६) हेमा विजय हेमाडे, ७) धिरज काशिनाथ पाटील, ८) संजय उर्फ तात्या प्रकाश जगताप, ९) विनोद उर्फ तात्या मंगा जगताप, १०) सुनिल हिरामण पाटील, ११) राजेंद्र रघुनाथ सोनवणे उर्फ छोटूभाऊ माळी, १२) गुलाब एकनाथ धोबी, १३) अनिल निंबा शिरसाठ, १४) अक्षय अशोक पाटील, १५) शुभम रणधीर, १६) प्रदिप वसंत सुर्यवंशी उर्फ पिनू सुर्यवंशी, १७) कैलास उर्फ बापू नामदेव मराठे, १८) नितीन विजय जडे, १९) गोपाल चंद्रसिंग राजपूत हे सर्व ऑफिसमध्ये येवून नितीन पाटील यास मारहाण, शिवीगाळ व ऑफीसपासून ते आझादनगर पोलिस स्टेशनपर्यंत पायी धिंड काढून मारहाण व शिवीगाळ व जिवे ठार मारण्याची धमकी देत घेवून गेले, त्यांच्या मारहाणीमुळे नितीन पाटील यांना दुखापत झालेली होती. पोलिस स्टेशनला बळजबरीने नेवून नितीन पाटील यांच्यावर आझादनगर पोलिस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला होता. याबाबत ऑफिसमधील कर्मचारी सुवर्णा राजपूत, कविता चौधरी आणि ब्रेन्च मॅनेजर ऋषिकेश पाटील यांनी कट करुन नितीन पाटील यास खोटया गुन्हयात गोवले असल्याचा आरोप नितीन पाटील यांनी केलेला आहे. नितीन पाटील यास पदावरून कमी करण्यासाठी आणि बदनाम करण्यासाठी १) सुवर्णा गोपालसिंग राजपूत, २) कविता संजय चौधरी, ३) ऋषिकेश भिमराव पाटील यांनी कट केला होता. याबाबत ग्रॅन्च मॅनेजर ऋषिकेश पाटील याने स्वतः नितीन पाटील यांना ईमेल करून कट केला असल्याची कबुलीच दिली होती. त्यामुळे नितीन पाटील यांनी कुटुंबात, मित्रमंडळी व समाजात खुपच बदनामी झालेली होती व आहे. या लोकांनी बळाचा वापर केला मात्र आझादनगर पोलिस स्टेशनचे तत्कालिन पोलिस निरीक्षक प्रमोद देवराम पाटील, आणि त्यांचे सहकारी यांनी त्यांच्याविरुध्द कोणतीही कारवाई केली नाही. याबाबत नितीन पाटील यांनी वेळोवेळी तक्रारी अर्ज सादर केलेले होते. पोलिस अधिकारी यांनी त्यांचे कायदेशीर कर्तव्य पार पाडले नाही म्हणून नितीन पाटील यांनी १) मा. श्री. प्रमोद देवराम पाटील, तत्कालीन मा. पोलिस निरीक्षक सो. आझादनगर पोलिस स्टेशन, धुळे सध्या हल्ली कार्यरत पोलिस निरीक्षक सो., धुळे तालुका पोलिस स्टेशन, धुळे २) मा.एल. एस. करंकार, मा. पोलिस उपनिरीक्षक सो. आझादनगर पोलिस स्टेशन, धुळे ३) मा.ए. ए. आखाडे, पोलिस ठाणे अंमलदार आझादनगर पोलिस स्टेशन, धुळे ४) मा.जे. एस. मोरे, CCTNS डयुटी मपोकों ९४५ आझादनगर पोलिस स्टेशन, धुळे यांचेविरोधात मानवी हक्क आयोग, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडे तक्रार दाखल केलेली आहे.




# नवीन योजनासंदर्भात शिवसेनेची पत्रकार परिषद

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** अर्थसंकल्पनामध्ये जाहीर झालेल्या योजनांचा घटकांपर्यंत त्यांचा लाभ मिळावा यासाठी जिल्ह्यातील नागरिकांना मदत करण्यासंदर्भात साक्री रोडवरील पत्रकार संघाच्या पत्रकार भवनात आयोजित पत्रकार परिषदेत येथे सविस्तर माहिती देण्यात आले. यावेळी शिवसेना जिल्हाप्रमुख सतिष महाले, जिल्हा प्रमुख तुळशिराम गावित, महानगरप्रमुख संजय गुजराथी आदी उपस्थित होते.

यावेळी त्यांनी माहिती देताना सांगितले कि, अर्थसंकल्पात महायुती सरकारने विविध योजनांची घोषणा केली आहे. मुख्यमंत्री लाडकी बहिण योजना देखील जाहिर करण्यात आली आहे. यासंदर्भात कागदपत्रांची पूर्तता करण्यासंदर्भात शिवसेनेचे प्रतिनिधी देखील नियुक्त करण्यात आले आहेत.तसेच खात्यात पैसे जमा होण्यापर्यंत मदत हे प्रतिनिधी करणार आहेत. तसेच घरगुती गॅस सिलेंडरची देखील घोषणा करण्यात आली. राज्य सरकारने काही कुटुंबांना वर्षाला तब्बल 3 घरगुती गॅस सिलेंडर मोफत देण्याचा निर्णय घेतला आहे. राज्य सरकारच्या या निर्णयामुळे सर्वसामान्य जनतेला मोठा दिलासा मिळणार आहे. मुख्यमंत्री अन्नपूर्णा योजना या माध्यमातून लाभार्थ्यांना तीन घरगुती गॅस सिलेंडर मोफत दिले जाणार आहेत. त्यासाठी देखील शिवसेना लाभार्थीना लाभ मिळून देण्यासाठी मदत करणार आहे. अशी माहिती शिवसेना जिल्हाप्रमुख सतिष महाले यांनी दिली.

शिवसेना जिल्हाप्रमुख  तुळशिराम गावित यांनी सांगितले कि, सरकारने कपाशी व सोयाबीनसाठी नुकसान भरपाई देखील जाहीर केली आहे. १ रुपयात पीक विमा योजना देखील जाहीर केली आहे. खरीप हंगाम 2023 करिता 40 तालुक्यांमध्ये दुष्काळ तर 1 हजार 21 महसूल मंडळांमध्ये दुष्काळसदृश्य परिस्थिती जाहीर करून विविध सवलती लागू करण्यात आल्या आहेत. तसेच वारीला जाणाऱ्या वारकऱ्यांना कोणतीही अडचण आल्यास त्यासाठी देखील मदत करण्याचे आदेश मुख्यमंत्र्यांनी  राज्यातील जिल्हाप्रमखाना दिले आहेत. अशी माहित पत्रकार परिषदेतून दिली. अर्थसंकल्पात जाहीर करण्यात आलेल्या योजनांचा लाभ लाभार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी मुख्यमंत्र्यांनी आपल्या पक्षाचे जिल्हाप्रमुख आणि पदाधिकाऱ्यांना आदेश दिले असून त्यासाठी जिल्हा आणि तालुका नुसार जबाबदारी निश्चित करून मोबाईल क्रमांकही जाहीर करण्यास सांगितले आहे. त्यानुसार सतीश महाले डॉक्टर तुळशीराम गावित संजय गुजराती यांनी संबंधित कार्यकर्ते आणि त्यांचे मोबाईल क्रमांक पत्रकार परिषदेत जाहीर केले. त्यात साखरी तालुक्यासाठी अजय सोनवणे मोबाईल क्रमांक ९५५२९४९०७२, अमोल बच्छाव मोबाईल क्रमांक ९१५८९२०००८, धुळे तालुका अनिल महाजन ९४२३४९७९७१, धुळे महानगर आशिष चौधरी ९९७०४१२३९३, प्रसाद महाले ७७६८०६६७४३,, शिरपूर तालुका दिनेश गुरव ९५४५४९८०००, मनोज धनगर ८८०५२७७००० यांचा समावेश आहे.

# पोलिस ठाण्यात कायदे विषयक शिबिर, विविध कायद्यांची माहिती

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** येथील पोलिस ठाण्यात कायदे व कामकाज विषयक शिबीराचे दि.२९ आयोजन करण्यात आले होते. शिबिरात बाल न्यायालयाचे कायदे या विषयावर प्रबोधन करण्यात आले. कायदा परिवेक्षक अधिकारी मा सुप्रिया इंगळे यांनी बाल लैंगिक अत्याचार बोल संगोपन यांवर विविध संस्थांतील कामकाजाची व बाल गुन्हेगारी कलमा, बाल सुधारणा कायदे विषयक माहिती दिली. तर ॲड. अनिता शिऊरकर बाल न्याय मंडळ, बाल न्यायालय विधी संघर्ष बालका बाबत कायद्या बाबत मार्गदर्शन करण्यात आले.ॲड शहा सदस्य बाल न्याय मंडळ यांनी ही बाल मंडळाचे कायदे नियम व बाल गुन्हेगारी सामाजिक पार्श्वभूमी यावर मार्गदर्शन केले. मा.दिवाणी व फौजदारी न्यायालय खुलताबाद न्यायाधिश इंदलकर यांनी बाल न्यायालयाचे कायदे या विषयीक सविस्तर माहिती दिली. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन ॲड. अब्बास पटेल यांनी केले तर समारोप आभार ॲड भास्कर नलावडे यांनी मानले. पोलिस निरीक्षक धनंजय फराटे, वकील संघाचे अध्यक्ष ॲड. खोसरे,ॲड भागडे, ॲड. अनिस काजी, ॲड. मिर्झा नसीब बेग सह पोलीस कर्मचारी उपस्थित होते.

# अश्लील विडीओ क्लिप व्हायरल करण्याची धमकी; भीमराव धोंडे यांना मागितली खंडणी

आधुनिक केसरी न्यूज

**नगर :** अश्लील व्हिडिओ क्लिप व्हायरल करण्याची धमकी देऊन माजी आमदार भीमराव धोंडे यांना ब्लॅकमेल करून एक कोटी रुपयांची खंडणी मागितल्याचा धक्कादायक प्रकार समोर 'आलाय. बलात्काराचा खोटा गुन्हा दाखल करण्याची धमकी देत दोन महिलांसह एका स्थानिक वृत्तवाहिनीच्यां पत्रकाराने खंडणी मागितल्याबाबत अहमदनगरच्या कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यांत आल्याने अहमदनगरमध्ये एकच खळबळ उडाली आहे. फिर्यादी हे बीड जिल्ह्यातील आष्टी मतदारसंघाचे माजी आमदार भीमराव धोंडे यांनी दिलेल्या फिर्यादीमध्ये नमूद केले आहे की, 'तुमची अश्लील व्हिडिओ क्लिप आमच्याकडे आहे. ती सोशल मिडियावर व्हायरल करायची नसेल, तर आम्हाला एक कोटी २५ हजार रुपये द्यावे लागतील, अशी खंडणीची मागणी करत दोन महिलांसह एका युट्युब पोर्टल चालवणाऱ्या तथाकथित पत्रकाराने माजी आमदाराला ब्लॅकमेल करत होते.

# परळीत गोळीबार, सरपंचाचा खून; दोन जण जखमी

आधुनिक केसरी न्यूज

**परळी :** शहरात दिवसेंदिवस गोळीबाराच्या घटना वाढतच असून पुन्हा शनिवारी रात्री परळी शहरा मध्ये गोळीबाराची घटना घडल्याने मोठे खळबळ उडाली आहे. दोन गटातील वाद टोकाला गेल्या मुळे हा गोळीबार झाल्याची समजते या गोळीबाराच्या घटनेने परळी शहर पुन्हा हादरले आहे. परळी शहरातील बँक कॉलनी परिसरात गोळीबारात एकाचा मृत्यू तर एक जखमी झाल्याची घटना घडली आहे. शनिवारी (ता. २९) रात्री नऊ वाजेच्या दरम्यान घडली आहे. तालुक्यातील मरळवाडी चे विद्यमान सरपंच बापूराव आंधळे यांच्यावर गोळीबार झाला. त्यात ते जागीच ठार झाले तर नंदागौळ येथील ग्यानबा मारोती गित्ते हे गंभीर जखमी झाले आहेत. या घटनेनी परळी शहर हादरले आहे. गोळीबाराच्या घटनेतील जखमेना तत्काळ उपचारासाठी रुग्णालयात दाखल केले आहे. या प्रकरणामुळे परळी शहरात वेगवेगळ्या चर्चांना उधाण आले आहे. रात्री उशिरापर्यंत पोलीसात गुन्हा दाखल झाला नव्हता.




# अज्ञात वाहनाच्या धडकेत चितळाच्या पिल्लाचा दुर्दैवी मृत्यू

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** बाबुपेठ जुनोना रस्त्यावर चितळच्या पिल्लाचा अज्ञात वाहनाच्या धडकेत अपघातात दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना उघडकीस आली. आज सकाळी पक्षी निरीक्षक विवेक वाघमारे हे जैविविधतेने नटलेल्या जुनोनाच्या जंगलात पक्षी निरीक्षणासाठी जात असतांना बाबुपेठ-जुनोना च्या जंगलात, रस्त्यावर एक चितळाच पिल्लू मृत अवस्थेत आढळले, लगेच त्यांनी हॅबिटॅट कन्झर्वेशनच्या दिनेश खाटे व सुरज देवगडे यांना घटनेची माहिती दिली. बाबुपेठ-जुनोना रस्ता हा संपूर्ण जंगल क्षेत्रातून जातो, सार्वजनिक बांधकाम विभाग, रस्ता सुरक्षा समिती यांना हॅबिटॅट कन्झर्वेशनच्या दिनेश खाटे यांनी जंगल क्षेत्रातून जाणाऱ्या रस्त्यावर नियमानुसार गतिरोधक बनविण्यासाठी वारंवार विनंती केली.

पण सार्वजनिक विभाग, रस्ता सुरक्षा समिती यांनी कुठलीही कारवाई केली नाही, परिणामी वन्यजीवांना अपघातात आपला जीव गमवावा लागत आहे, रस्त्याचे रुंदीकरणाला सुद्धा हॅबीटॅट कन्झर्वेशन सोसायटी ने विरोध केला होता पण तात्पुरता वेळेवर स्थगिती देऊन कालांतराने रुंदीकरण करण्यात आले, हा रस्ता बाबुपेठ-जुनोना-बल्लारशाह, जुनोना-चिचपल्ली व पोंभुर्णा हा संपूर्ण ४२ किलोमीटर व बाबुपेठ-चिचपल्ली २६ किलोमीटर चा रस्ता संपूर्ण जंगलातून जातो व नेहमी वन्यप्राण्याचा वावर असल्याने गती रोधकांची मागणी संस्थेतर्फे करण्यात आली होती. ह्या एका महिन्यात दोन चितळ व एका सांबराचा मृत्यू बाबुपेठ-जुनोना रस्त्यावरती झाला आहे, काही वर्षांपूर्वी जुनोना पासून काही अंतरावर एका वाघाचा सुद्धा अपघाती मृत्यूची नोंद आहे, आणि एका अस्वलाची सुद्धा, इतके अपघात होत असतांना सार्वजनिक बांधकाम विभाग, रस्ता सुरक्षा समिती गती-रोधक देण्यास का धजावत आहे माहिती नाही, पण ह्या रस्त्यावर रेती चे ट्रक रात्री खूप वेगाने धावतात, ह्यात रेती वाहतूक करणाऱ्या ट्रक ने अस्वलाचा जीव घेतला होता, पण हि वाहतूक रात्रची का होते हे मात्र कळायला मार्ग नाही. आणखी किती वन्यजीवांचा बळी गेल्यावर सार्वजनिक बांधकाम विभाग, रस्ता सुरक्षा समिती जागी होणार आहे कुणास ठाऊक,ताडोबाच्या बफर



क्षेत्रात पदमापूर ते मोहर्ली गतिरोधक चा रस्ता सार्वजनिक बांधकाम विभागाने बांधला आहे मग तिथले वन्यप्राणी महत्वाचे आणि जुनोना जंगलातील वन्यप्राणी मागासलेले असा दुजाभाव का? बर सार्वजनिक बांधकाम विभाग यांना पदमापूर ते मोहर्ली गतिरोधक बांधा म्हणून कुणत्या गावकर्यांची किंवा वनविभाग, वन्यजीव संस्थेची मागणी होती केली होती काय, तर याच उत्तर अजून पर्यंत सार्वजनिक बांधकाम विभाग यांना सापडलेलं नाही. बाबुपेठ-जुनोना-पोंभूर्णा रस्त्यावर गती रोधक बनवावे व अवैध वाहतुकीला आळा घालावा, सूचना फलक सुद्धा लावावे ह्याचा थोडा फार फायदा होईल अशी मागणी हॅबीटॅट कन्झर्वेशन सोसायटी तर्फे सार्वजनिक बांधकाम विभाग, रस्ता सुरक्षा समिती ला करण्यात आली आहे, ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पाप्रमाणे जूनोण्याचे जंगल सुद्धा जैवविविधतेने संपूर्ण आहे, ह्या जंगलाकडे सुद्धा लक्ष देण्याची गरज अत्यंत गरज आहे. असे हॅबिटॅट कन्झर्वेशनच्या दिनेश खाटे यांनी वनविभागास मत व्यक्त केले. वनविकास महामंडळ चे वनपरिक्षेत्र अधिकारी ए. न. मेश्राम व क्षेत्र सहाय्यक डी. जी. कांबळे घटनास्थळी दाखल होऊन पंचनामा करून, चितळ ताब्यात घेऊन, जुनोना येथे शवविच्छेदन डॉ. कुंदन पोडसेलवार यांनी केले, वनरक्षक आर. डी. पायपरे, वनमजूर देठे घटनास्थळी उपस्थित होते.



# शिर्डी शहरावर तिसऱ्या डोळ्याची नजर

## उपविभागीय अधिकारी शिरिष वमणे

आधुनिक केसरी न्यूज

**शिर्डी :** वाढत्या गुन्हेगारीला लगाम बसवण्यासाठी जिल्हा पोलीस प्रमुख राकेश ओला यांच्या मार्गदर्शनाखाली नगर जिल्ह्यात प्रयत्न सुरू आहे त्या अनुषंगाने शिर्डी शहरात देखील गुन्हेगारी रोखण्यासाठी उपविभागीय अधिकारी शिरिष वमणे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रयत्न सुरू असून वाहनचोरी दुचाकी चोरी धुमस्टाईल चोरी घरफोडी बेशिस्त वाहतुक असे प्रकार रोखण्यासाठी शिर्डी शहरात आत व बाहेर येणारे जाणारे रस्ते उपनगर चौक महत्त्वाचे ठिकाणे युध्दपातळीवर जास्त उच्च क्षमता असलेले सीसीटीव्ही बसवण्याचे काम सुरू असून ८०कॅमेरे बसवण्यात आले असून जवळपास आणखी मोठ्या प्रमाणावर कॅमेरे बसवण्याचे काम अविरतपणे सुरू झाले असून त्यामुळे दुचाकी व धुमस्टाईल चोरीला आळा बसल्याचे पोलीस निरीक्षक रामकृष्ण कुंभार यांनी सांगत आता शिर्डी शहरावर आता सी सी टीव्ही माध्यमातून तिसऱ्या डोळ्याची देखील बारीक नजर राहणार असल्याने सागुन हे कॅमेराचे कंट्रोलिंग शिर्डी पोलीस स्टेशन नियंत्रण कक्षात राहणार आहे त्या ठिकाणी बसवलेल्या सर्व टिव्हीवर हे चित्रन पोलीसांना बघता येणार असल्याचे सागुन संशयित गुन्हेगार पकडण्यासाठी शिर्डी पोलीसांना मोठा फायदा होणार असल्याचे सांगितले

शिर्डी साईबाबा मंदिर हे आंतरराष्ट्रीय दर्जाचे दुसऱ्या क्रमांकाचे देवस्थान आहे देशभरातुन साईभक्त भाविक मोठ्या प्रमाणावर येत असल्याने शिर्डी शहरात नेहमीच मोठी गर्दी होत असते शिर्डी शहर उपनगरे महत्त्वाचे चौक शिर्डी शहरात कोणत्याही बाजुने जरी प्रवेश केला तरी तो या अती उच्च दर्जाचे कॅमेरात सहजपणे केद्रीत होणार आहे त्याचबरोबर शिर्डी शहरात सुरक्षेसाठी नेहमीच खबरदारी घेतली जाते त्याबरोबरच बेशिस्त वाहनचालक कुठेही रोडवर वाहने उभे करणारे टिबल शिट चालवणारे दुचाकी चालक टवाळखोर रस्यांवर वाढदिवस साजरे करणारे यांच्यावर देखील सी सी टीव्हीची नजर राहणार आहे. यातील काही कॅमेरे सुरू देखील झाले आहे राहीलेले कॅमेरे देखील लगतच्या काळात सुरू होणार असून त्यासाठी युद्धपातळीवर काम सुरू असून ज्या ठिकाणी हे कॅमेरे बसवण्यात आले आहे त्या ठिकाणी मोठ्या प्रमाणावर उंच पोल उभे करून चारही बाजूंनी येणारे जाणारे वाहने दुचाकी चालक नागरिक देखील यात स्पष्ट पणे दिसणार आहे.

**पोलीसांसाठी फायदेशीर :** शिर्डी शहर परीसर नगर मनमाड महामार्ग उपनगरे महत्त्वाचे ठिकाणे शहरात येणारे व बाहेर जाणारे रस्ते गर्दिचे ठिकाण ज्या ठिकाणी गुन्हे घडले आहे असे ठिकाण साईबाबा हॉस्पिटल साईनाथ हॉस्पिटल मंदिर परीसर अशा सर्व ठिकाणी साईभक्त भाविकांचा मोठ्या प्रमाणावर गर्दी असते अशा महत्त्वाचे ठिकाणी मोठ्या प्रमाणावर सीसीटीव्ही बसवले आहेत . काही ठिकाणी बसवले जात आहे . त्याचा गुन्हेगारी रोखण्यासाठी फायदा होईल .
**शिरिष वमणे, उपविभागीय अधिकारी**

# विधानसभा निवडणुका जाहीर होतील; कार्यकर्त्यांनी कामाला लागावे

## भाजपा नेते मारोतराव कवळे गुरूजी

आधुनिक केसरी न्यूज

**साईनाथ हमदे गोळेगावकर**

**उमरी :** विधानसभा निवडणुका थोड्याच दिवसात लागतील



आपण केलेले कामे व पक्षाच्या माध्यमातून विविध योजनांचा लाभ मिळाला ते माहिती कार्यक्रत्यांनी सक्षम पणे घराघरा माहिती द्यावे. येणार्या विधानसभा निवडणुकीत पक्षाने नक्कीच आपले काम पाहून विचार करेल त्यासाठी सामदामदंड वापरून आपणच निवडणूक लढविणार असून कार्यक्रत्यानी कामाला लागावे असे व्ही.पी.के.उद्योग उद्योग समूहाचे अध्यक्ष तथा भाजपाचे नेते मारोतराव कवळे गुरूजी यांनी उपस्थित कार्यक्रत्यांना आहावान केले. यावेळी गणपतराव पाटील हस्सेकर,बापुराव पाटील करकाळेकर,प्रभाकरराव पुयेड, गणेशराव पाटील सरसे, जिल्हा उपाध्यक्ष सुधाकरराव देशमुख धानोरकर, आघाडीचे जिल्हाध्यक्ष अमोल पाटील ढगे, धर्माबाद बाजार समितीचे संचालक राजीव पाटील बोळसेकर, आनंदराव पाटील जामगावकर,दत्ताहरी पाटील कावलगुडेकर, पाडुरंग गळगे, चंद्रकांत पाटील हंबर्डे, संदिप पाटील कवळे, गोविंद पाटील जिगळेकर,मारोतराव पवार हातनीकर, नितीन पाटील पुयेड,अशोक पाटील कदम,मारोतराव उमाटे, विलास पाटील नरवाडे, बालाजीराव नासलवाड, मधुकर पाटील शिंदे, गोविंद ढगे, कैलास कवळे, वसंत जाधव, देविदासराव थेटे,बालाजी पाटील हुंडेकर,रावण पाटील, व्यंकटी पाटील, माधवराव पाटील ढगे, नानाराव पाटील, श्रीनिवास ढगे,माधवराव शेलगावकर, वामन पाटील एकनाथ पाटील, यासह हजारो कार्यक्रत्य उपस्थित होते.

यावेळी सुधाकरराव देशमुख धानोरकर, अमोल पाटील ढगे,राजीव पाटील बोळसेकर, दताहरी पाटील, आनंदराव पाटील,पाडुरंग गळगे,गोविंद पाटील जिगळेकर, मारोती पाटील पवार,व्यंकटी पाटील, रावण पाटील, यासह अनेकांनी आपले विचार मांडताना कवळे गुरूजी तुमच्यासाठी भारतीय जनता पक्षाकडून उमेदवारी मिळुन देण्यासाठी वाटेल ते करू,भागात उद्योग उभारल्यामुळे शेतकरी,शेतमजूर बेरोजगार तरुणाचे भले झाले,व्यापार पेठ भरभराटीला आले,सतत सर्वसामान्य लोकांपर्यंत तुम्ही पोहचता,अनेकांच्या सुखदुखात सहभाग तुमचा असतो.पक्ष काम करणाऱ्यांनाच उमेदवारी देतो तुम्ही जनतेच्या व सर्वसामान्य हिताचे काम केलात.रस्ते,नाल्या,इमारती उभे करणे म्हणजे गावा गावचा सरपंच उपसरपंच व ग्राम पंचायत सदस्य व त्यांची कमिटी करतो हा विकास नव्हे त्या गावाच्या गरजा आहेत. कवळे गुरूजी तुम्ही एका मंञ्या पेक्षा ही जास्त काम मतदार संघात काम केलात हे आम्हीच नाही तर नांदेड जिल्हाला आपला हेवा वाटावे अशी ओळख निर्माण तुम्ही स्वतांची केलात. जो पक्षातील व्यक्ती सतत सामान्यांचे काम करतो, सतत जनतेत असतो त्यालाच उमेदवारी पक्ष देतो कवळे गुरूजी तुम्ही भारतीय जनता पार्टी पक्षाच्या समोर पास झाला आहात.तुमचे काम पाहुन विरोधकांना सुधा हेवा वाटतो हे नाकारता येत नाही.एकीकडे सामान्यांच्या फोन उचलत नाही,सामन्याचे काम करीत नाही,उदंट वागतो, पक्षाकडून इतरांना ञास होईल असे वागतो अशांना पक्ष नापास करतो. म्हणून येणारा काळ कवळे गुरूजी तुमचा आहे.कार्यक्रत्य व जनता सांभाळायचे तुम्हाला हातोटी आहे तुम्ही अभ्यासू गुरूजी म्हणजे हेडमास्तर आहात. तुम्हाला निवडून आणण्यासाठी आम्ही तरुण मंडळी, जेष्ठ, कनिष्ठ आधी कार्यक्रत्य पराकाष्ठा करून निवडून आणू असे अनेकांनी मनोगतातुन विचार मांडले. सुञसंचलन संतोष सरसे तर आभार आनंदराव पाटील यांनी मानले.

# अवैधरित्या जनावराचे मांस वाहतूक; वाहनासहित २५ लाखांचा मुद्देमाल जप्त

आधुनिक केसरी न्यूज

**बल्लारपूर :** तेलंगणात घेऊन जाणाऱ्या अवैधरित्या जनावराचे मांस वाहतूक करताना बल्लारपूर पोलीसांनी एका वाहन सहित २५ लाखाचा मुद्देमाल जप्त केले असून एका आरोपीला अटक केले आहे. बल्लारपुर पोलीसांना मुखबिरच्या खबरेवरुन माहिती मिळाली की एका आयचर गाडी मधुन जनावराचे मांस तेलंगणात घेऊन जात आहे. सदर माहिती वरून मुख्य मार्गावरील जिओ कार्यालय जवळ सापळा रचला. एक आयचर गाडी भरधाव वेगाने येत असताना त्या वाहनाला थांबवून तपासले असता त्या वाहनात प्लॉस्टीकच्या आवरणात जनावराचे मास होते. सदर वाहनाचे मौका पंचनामा केले असता अंदाजे ८ लाख रुपयेचे जनावराचे मांस होते.

तसेच आयचर वाहन क्रं. एम एच ४० ए के ४८७३ किंमत १७ लाख असे मिळून मुद्देमाल २५ लाख रुपये जप्त केले आहे. गाडी चालक आरोपी नामे मोहम्मद इमरान मोहम्मद इरशाद (३०) रा. कोळसा टाल कामठी जि. नागपुर याला अटक करण्यात आले. बल्लारपूर पोलीसांनी गुन्हा रजि. क्रं. ६६२/२०२४ कलम-४२९ भा. दं. वि. सहकलम- ५, ५ (सी),



९, ९ (ए), ९ (बी) महा. पशु संरक्षण अधिनियम १९७६ प्रमाणे गुन्हा नोंद केले आहे. सदरची कारवाई पोलीस अधिक्षक मुमक्का सुदर्शन, अप्पर पोलीस अधिक्षक रिना जनबंधु, जाधव उपविभागीय पोलीस अधिकारी, गडचांदूर अतिरिक्त कार्यभार राजुरा यांचे मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक आसिफराजा बी. शेख, सहाय्यक पोलीस निरीक्षक दिपक कांक्रिडवार, पोलीस उपनिरीक्षक विक्की लोखंडे, चापो. उपनिरीक्षक भास्कर कुंदावार, सफौ. गजानन डोहीफोडे, पोहवा. रणविजय ठाकुर, पोअं. वशिष्ट रंगारी, शेखर माधनकर, लखन जाधव, गणेश पुरडकर, राहुल घुडसे इ. स्टॉफ यांनी केली आहे.

# पर्यावरण संवर्धन काळाची गरज : प्रा. आशिष इंगळे

## दहा गावांत दहा हजार वृक्ष लागवड उपक्रमास सुरुवात

आधुनिक केसरी न्यूज

**गोपाल सातपुते**

**हिंगोली :** निसर्ग व सामाजिक पर्यावरण प्रदूषण निवारण मंडळ महाराष्ट्र राज्य आयोजित राज्यभर ठीक ठिकाणी वृक्षारोपण मोठ्या प्रमाणात केले जात आहे. त्याच प्रमाणे निसर्ग व सामाजिक पर्यावरण प्रदूषण निवारण मंडळ महाराष्ट्र राज्य जिल्हा हिंगोली यांच्या संयुक्त विद्यमानाने हिंगोली जिल्ह्यात वृक्ष लागवडीचा शुभारंभ जिल्ह्याचे पर्यावरण मंडळाचे प्रा. आशिष इंगळे यांनी बौद्ध विहार माळहिवरा ता. जी. हिंगोली येथे 50 वृक्ष लागवड करून करण्यात आला.प्रा. इंगळे यांनी आतापर्यंत एक हजार च्या वर वृक्ष संवर्धन साठी स्वखर्चाने दान दिले आहे. त्यांनी नागरिकांना आव्हाण केले आपण या वृक्षारोपण संवर्धनाच्या उपक्रमा मध्ये सहभागी होऊन पर्यावरण वाचविण्याचा संकल्प करावा. आज आपण पाहतो की उन्हाळ्यात किती भयंकर उष्णतेची लाट पसरली आणि राजधानी दिल्लीचे तापमान 52C वर जाऊन पोहचले कित्येक मृत्यू हे उष्माघातने झाले आहे. महाराष्ट्र राज्यातील अकोला. नागपूर येथील तापमानत वाढ होऊन ते 47C वर पोहचले. तेव्हा या वर आळा घालायचा असेल तर खूप मोठ्या प्रमाणावर वृक्षारोपण करणे गरजेचे आहे त्याची जनजागृती करणे महत्वाचे आहे. दरवर्षी शासन वृक्षारोपण करते पन त्याचबरोबर आपण ते वृक्ष किती जगवितो याकडे पन लक्ष देणे महत्वाचे आहे.

वातावरणात होणारा अमूलाग्र बदल, शहरीकरण त्यामुळे होणारे अमाप जंगल तोड आणि त्याचे वातावरणावर होणारे परिणाम हे निसर्गास हानिकारक होत चालले आहेत. निसर्ग वाचला तर मानव जात वाचेल सजीव श्रुष्टि जगेल. आणि हे तेव्हाच होईल जेव्हा मोठ्या प्रमाणावर वृक्ष लागवड केली जाईल. प्रा. आशिष इंगळे यांच्यासह निसर्ग व सामाजिक पर्यावरण प्रदूषण मंडळ महाराष्ट्र राज्य जिल्हा हिंगोली यांनी दहा गावात दहा हजार वृक्षारोपण करण्याचा संकल्प केला असून जिल्ह्यातील जास्तीत जास्त नागरिकांनी या सामाजिक कार्यात सहभाग नोंदऊन सहकार्य करण्याचे आव्हाण प्रा. आशिष इंगळे यांनी केले आहे.





# पशुवैद्यकीय डॉ. केशवराव तोडे यांचा सेवापूर्ती सत्कार सोहळा थाटात साजरा

आधुनिक केसरी न्यूज

**साईनाथ हमदे गोळेगावकर**

**उमरी :** पशुवैद्यकीय दवाखाना गोळेगाव येथील सहाय्यक पशुधन विकास अधिकारी केशवराव संभाजी तोडे यांचा सेवापूर्ती सत्कार सोहळा मौजे गोळेगाव तालुका उमरी येथे दिनांक 29 जून शनिवार रोजी मोठ्या उत्साहात संपन्न झाला. या सेवापुर्ती सोहळ्याचे आयोजन आकाश बामणे यांनी केले होते. डिसेंबर 2023 मध्ये गोळेगाव येथील पशुवैद्यकीय दवाखान्यात सहाय्यक पशुधन विकास अधिकारी रुजू झालेले डॉ. केशवराव तोडे जवळपास सहा महिने त्यांनी गोळेगाव येथे पशुधन विकास अधिकारी म्हणून काम केले. आज दिनांक 29 जून 2024 रोजी ते सेवानिवृत्त झाले. केशवराव तोडे यांचा पशुवैद्यकिय क्षेत्रातील एकंदरीत प्रवास- डॉक्टर केशवराव तोडे ऑक्टोबर 1993 मध्ये दत्त शिखर माहूर येथे प्रथम रुजू झाले तेथील आदिवासी भागात त्यावेळी दळणवळणाची साधने नसताना माहूर येथून 18 ते 20 किलोमीटर वाडी तांड्यावर जाऊन गुराढोरांचा उपचार व लसीकरण करावे लागत होते तेथील लोक वाडीत आल्यावर गेल्याने जेवल्याशिवाय येऊ देत नव्हते त्यांचा तो प्रेमळ स्वभाव आपले पणा टाळता येत नसायचे. त्यामुळे तेथील लोकांची प्रेम पाहून 20 किलोमीटर की. मी.चा प्रवास केला तरी काहीच वाटत नसायचे तेथून पुढे त्यांची 1995 मध्ये मदनुर तालुका बिलोली येथे त्यांची बदली झाली. या ठिकाणी सुद्धा त्यांना वैद्यकीय सेवा करत असताना कुठलीच अतिशय चांगल्या प्रकारची वागणूक दिली आहे कारण तेथील शेतकरी लोक अतिशय प्रेमळ स्वभावाचे होते या ठिकाणी जवळपास सात वर्षे त्यांनी पशुवैद्यकीय सेवा दिली. येथील लोकांनी या सात वर्षांमध्ये त्यांना भाजीपाला सुद्धा विकत घेण्याची गरज पडू दिली नाही. त्यानंतर त्यांनी किवळा तालुका लोहा येथे अकरा वर्ष सेवा दिली तेथील लोकांची त्यांना भरपूर सहकार्य लाभले त्यानंतर त्यांनी 2013 मध्ये प. स. कंधार काही वर्ष आपली सेवा दिली. ठेतील लोकांनी सुद्धा त्यांना अतिशय चांगल्या प्रकारची वागणूक दिली व सहकार्य केले. त्यानंतर त्यांची बदली डिसेंबर 2023 रोजी पशुवैद्यकीय दवाखाना गोळेगाव येथे सहाय्यक पशुधन विकास अधिकारी म्हणून झाली. गोळेगाव येथे जवळपास 7 महिने त्यांनी पशुवैद्यकिय सेवा दिली आणि ते जून 2024 रोजी सेवानिवृत्त झाले. त्यांनी या 7 महीन्यातील गोळेगाव येथील अनुभव सांगिला त्यात सांगत होते. गावातील लोक अतिशय प्रेमळ मनमिळाऊ स्वभावाचे असून या सात महिन्यांच्या सेवेमध्ये त्यांच्या कडून खूप मान सन्मान मिळाला. असे ते सांगत होते. या सेवापूर्ती सत्कार सोहळ्याच्या ठिकाणी उपस्थित शिंदे योगेश, आकाश बामणे, नितीन कांबळे, गंगाधर कचकलवाड, मनोज पाटील गोळेगावकर, नागेश तूपसाखरे रामा यमलवाड, राजेश शिंदे, संतोष पाटील डोईफोडे, माधव यमलवाड, पवन शिंदे, अरुण कांबळे रमेश तोगरवाड आदी बांधव उपस्थित होते.

# वीजेची ये-जा चालुबंद; संतप्त सरपंचाने विचारला अभियंता व वायरमनला जबाब

## तीनचार दिवसांत सुधारण्याची हमी

आधुनिक केसरी न्यूज



**बाजार सावंगी :** खुलताबाद तालुक्यातील मौजे दरेगाव व पाडळी येथे बाजार सावंगी ३३/११केव्ही सबस्टेशन येथून वीज पूरवठा करताना वीजेची ये-जा बंद चालु तर रात्री सतत बंद यामुळे तेथील नागरिक त्रस्त झाल्याने दरेगावचे सरपंच संदिप गायकवाड यांनी संतप्त होवून चिडून जावून वीज केंद्रच (दि.२६) बंद करण्याचा प्रयत्न केला तर वीज समस्या बाबत कनिष्ठ अभियंता व वायरमनला जवाब विचारला.

गावात वायरमन न येणे, न राहणे, सतत वीजेची ये-जा तर रात्री वीज पुरवठा बंद, कंपनीकडे आवश्यक सामान नसणे, कर्मचाऱ्यांचा अभाव, मागणी करुनही ही समस्याचे निवारण न करणे, केंद्रात कनिष्ठ अभियंता न राहणे,डीपीत व इतर यंत्रणात सतत काही ना काही बिघाड सांगुन समस्याचा निवारण ऐवजी चालढकल करणे व वीज पुरवठा सुरळीत न ठेवणे या सर्व समस्यांला घेवून दरेगाव चे सरपंच संदिप गायकवाड सबस्टेशन मधे ठय्या मांडत वीज केंद्र बंद करण्याचा प्रयत्न केला तर कनिष्ठ अभियंता व वायरमनला याचा जवाब विचारला यासंदर्भात प्रभारी कनिष्ठ अभियंता यांनी तीनचार दिवसांत या सर्व तक्रार प्रकरणात दुरुस्ती करु असी हमी दिली आहे. यावेळी मोठ्या संख्येने नागरिक पोलिस उपस्थित होते.

गुप्तरोगाबाबत काहीही लपवू नका



(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in



# आम्ही जरांगे चित्रपटात बहिणीची भूमिका साकारणाऱ्या सौ. लिनाताई जाधव यांचा सत्कार

आधुनिक केसरी न्यूज

**हिंगोली :** शिवशक्ती प्रतिष्ठानच्या अध्यक्षा लीना जाधव यांना आम्ही जरांगे या मराठी चित्रपटामध्ये मराठा योद्धा मनोज जरांगे पाटील यांच्या बहिणीची भूमिका साकारण्याची संधी मिळाल्याने त्यांचा राष्ट्रवादी शरद पवार गटाचे हिंगोली विधानसभेचे नेते तथा माजी जिल्हा परिषद उपाध्यक्ष अनिल पतंगे व सौ किरणताई पतंगे यांनी त्यांच्या हिंगोली येथील निवासस्थानी बोलावून सत्कार व त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या यावेळी अर्चना पतंगे, सिंधुताई पतंगे, मनीषा झांजरी, शुभांगी पाटील इत्यादी महिला भगिनी उपस्थित होत्या.

# राज्य सरकारचा मोठा निर्णय! आता पांढऱ्या रंगाच्या शिधापत्रिकाधारकांनाही मिळणार मोफत उपचार!

आधुनिक केसरी न्यूज

**पांढरकवडा :** सुदृढ आरोग्य हा प्रत्येकाचाच अधिकार आहे. हीच बाब लक्षात घेऊन जनतेचा आरोग्यविषयक खर्च कमी व्हावा यासाठी सरकारकडून वेगवेगळ्या योजना राबवल्या जातात. महाराष्ट्रातील महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना (MAHATMA PHULE JAN AROGYA YOJANA) आणि प्रधानमंत्री जनआरोग्य योजना (PRADHAN MANTRI JAN AROGYA YOJANA) या दोन्ही योजनांच्या माध्यमातून नागरिकांना मोफत उपचार दिले जातात. याच योजनेची व्याप्ती आता वाढवण्यासाठी राज्य सरकारने आणखी एक पाऊल टाकले आहे. सरकारनेक पाढऱ्या रंगाची शिधापत्रिका आधार कार्डशी संलग्न करून घेण्याच्या सूचना दिल्या आहेत. या सूचनेनंतर आता पांढऱ्या रंगाची शिधापत्रिका असणाऱ्यांनाही जनआरोग्य योजनेचा लाभ मिळणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. **शिधापत्रिका आधार क्रमांकाशी संलग्न करण्याची सूचना :** महाराष्ट्र सरकारच्या अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्रालयाने नुकताच एक आदेश जारी केला आहे. या आदेशानुसार शुभ्र शिधापत्रिका आधार क्रमांकाशी संलग्न करून घेण्याची कार्यवाही चालू करावी, असा आदेश सर्व जिल्हा पुरवठा अधिकारी, सर्व अन्नाधान्य वितरण अधिकारी तसेच उपनियंत्रक शिधावाटप मुंबईच्या विभागांना तशा सूचना दिल्या आहेत. शुभ्र शिधापत्रिकाधारक कुटुंबांना महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजनेचा लाभ देण्याकरिता आयुष्यमान कार्ड निर्माण करण्यासाठी शिधापत्रिका आधार क्रमांकाशी संलग्न करण आवश्यक आहे. **दोन्ही योजना एकत्रितपणे राबवण्याचा घेतला होता निर्णय :** सार्वजनिक आरोग्य विभागाच्या 25 फेब्रुवारी 2019 सालच्या आदेशान्वये महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना व आयुष्यमान भारत-प्रधानमंत्री जन आरोग्य योजना यांची सांगड घालून या दोन्ही योजना राज्यात एखत्रितपणे राबवण्याचा निर्णय घेण्यात आला होता. त्यानंतर 28 जुलै 2023 मध्ये आणखी एक आदेश जारी करून राज्य सरकारने शुभ्र शिधापत्रिधारक कुटुंबांनाही या योजनेचा लाभ देण्यात येईल असे जाहीर केले होते. याच आदेशाची आता अंमलबजावणी केली जात आहे. त्यासाठी शुभ्र शिधापत्रिका आधार क्रमांकाशी संलग्न करण्याच्या प्रक्रिया चालू करण्याचा आदेश देण्यात आला आहे. दरम्यान, केंद्र आणि राज्य सरकारच्या या योजनेच्या माध्यमातून रुग्णांवर पाच लाख रुपयांपर्यंतचे उपचार मोफत केले जातात. त्यामुळे खासगी रुग्णालयात उपचार घेणाऱ्या रुग्णांना एका प्रकारे मोठा दिलासा मिळाला.




## अशोक वनातील 'श्रीजया'ची वाट काटेरी?

### भोकर विधानसभेत रंगतदार सामना : काँग्रेसची मोर्चेबांधणी

आधुनिक केसरी न्यूज

**भोकर :** माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांनी ऐन लोकसभेच्या तोंडावर कोलांटीउडी मारून भाजपाशी घरोबा केल्याने राजकीय समीकरण बदलले आहे. काँग्रेसचा गड भाजपा सर करणार अशी शक्यता असताना मतदारांनी काँग्रेस पक्षाच्या बाजूने कौल दिला.होऊ घातलेल्या विधानसभा निवडणुकीत भाजपा तील अंतर्गत गटबाजी आणि काँग्रेसला मिळालेला प्रतिसादामुळे भाजपाची कोंडी होण्याची शक्यता आहे. 'अशोक वनात' श्रीजया अशोक चव्हाण यांची वाट काटेरी होणार असल्याचे समजते. यातुन सहिसलामत सुटका करण्यासाठी अग्नी परिक्षेला सामोरी जावे लागणार आहे.काँग्रेसचा गड साबूत ठेवण्यासाठी वरिष्ठ पातळीवरून पाया लगतचा 'खंदक' आणखी मजबूत करण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत. प्रतिष्ठेच्या लढतीत कोण बाजी मारेल हे येणारा काळच ठरवेल.



भोकर विधानसभा मतदारसंघ हा प्रारंभीपासून काँग्रेस पक्षाचा गड म्हणून राजकीय पटलावर वेगळी ओळख आहे.प्रामुख्याने माजी केंद्रीय गृहमंत्री (कै.)शंकरराव चव्हाण यांची राजकीय वाटचाल याच मतदारसंघातून झाली योगायोगाने त्यांचे सुपुत्र माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांनी मतदार संघाची फेररचना झाल्याने भोकर मतदारसंघातून प्रतिनिधित्व करण्याची नामी संधी मिळाली.दरम्यानच्या काळात चव्हाण कुटुंबीय व येथील मतदारात जिव्हाळ्याचे नाते निर्माण झाले आहे, असे असताना मागील लोकसभा निवडणुकीत थोडा दूरावा निर्माण झाल्याने अशोक चव्हाणांना पराभुत व्हावं लागल्याने ते जिव्हारी लागलं.सिंहावलोकन करून पून्हा 'फिनिक्स' पक्षासारख राजकीय पटलावर झेप घेतली. सार काहि समाधान कारक सुरू असतांना अशोक चव्हाणांनी आमदारकीचा राजीनामा देऊन रातोरात भाजपात प्रवेश केल्याने मतदार संघातील जनता अवाक झाली. ऊदात अंतकरनानी साथ दिली असताना जनतेला वा-यावर सोडून गेल्याने मतदाराला तो निर्णय रूचला नाही.या शिवाय मराठा आरक्षण,महागाई,पक्षफोडीचे राजकारण,अहंकाराचा फटका भाजपाला बसल्याने नांदेड लोकसभा निवडणुकीत विजयाची खात्री असताना पराभव पत्करावा लागला.त्या नंतर भाजपानी पराभवाची कारणे शोधून नव्याने होऊ घातलेल्या विधानसभा निवडणुकीत पुन्हा उभारी घेण्यासाठी जोरदार हालचाली सुरू केल्या आहेत.भाजपा कडून भोकर विधानसभा मतदारसंघात अशोक चव्हाण यांची कन्या श्रीजया अशोक चव्हाण, डॉ.माधवराव किन्हाळकर ईच्छुक आहेत. तर शिवसेना (ऊबाठा) गटाकडून बबन बारसे, काँग्रेसकडुन बी.आर. कदम,पप्पू कोंढेकर, बाळासाहेब पाटील रावणगावकर, बिआरएस नागनाथ घिसेवाड ईच्छुक आहेत.




**श्रीजयाची वाट काटेरी :** होऊ घातलेल्या विधानसभा मतदारसंघातून माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांची कन्या श्रीजया चव्हाण इच्छुक असुन आतापासूनच तयारी सुरू आहे. येथील मतदार चव्हाणाच्या बाजूने भक्कमपणे उभे असताना मागील लोकसभा आणि नूकत्याच झालेल्या लोकसभेत मतदारांनी चव्हाणाच्या विरोधात भुमिका घेतली .आता राजकीय समीकरण बदलल्याने राजकारणात प्रथमच पाऊल ठेवणा-या श्रीजयाच्या विजयाचा मार्ग मोकळा करण्यासाठी चव्हाणांना तारेवरची कसरत करावी लागणार आहे . ते काय भूमिका घेतात यावर सारकाही अवलंबून आहे .

**काँग्रेसची जोरदार तयारी :** अशोक चव्हाण यांच्या भाजपा प्रवेशाने काँग्रेस पक्षाची ताकद कमी होणार असे राजकीय जाणकारांचे मत होते .पण पत्ते उलटले आणि लोकसभेत काँग्रेस पक्षाचे उमेदवार वसंतराव चव्हाण हे विजयी झाल्याने काँग्रेस कार्यकर्त्यांत "बळ" आलं .कॉंग्रेस पक्षाचा गड साबुत ठेवण्यासाठी जोरदार तयारी सुरू केली आहे . दूसरीकडे बिआरएस, वंचित बहूजन आघाडी यांची भुमिका निर्णायक ठरणार आहे .

## नव मतदारांनो, मतदार यादीमध्ये आपले नाव समाविष्ट करा : रेड्डी

आधुनिक केसरी न्यूज



**बाबुराव गोणारकर**

**धर्माबाद :** काही महिन्यांमध्ये विधानसभा आणि स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका होणार असल्याने नविन मतदारांना २५ जूनपासून मतदान यादीमध्ये नवीन नाव समाविष्ट करता येणार आहे.नवीन नाव समाविष्ट करण्याची अंतिम तारीख २४ जुलै आहे तरी नविन मतदारांनी आपले नवीन नाव समाविष्ट करत लोकशाही बळकट करण्याचे अवाहण मनसे शहराध्यक्ष सचिन रेड्डी यांनी केले आहे. केंद्रिय निवडणूक आयोगाने मतदान नोंदणीपासून ते पत्ता बदलण्यासाठी विशेष मोहिम राबवण्याची सूचना राज्य निवडणुक आयोगाला दिली आहे.२५ जून पासून नविन मतदार नोंदणीला सुरुवात झाली आहे.२४ जुलै पर्यंत मतदारांना आपले नाव समाविष्ठ करता येणार आहे. दरम्यान या मोहिमेमध्ये मतदार यादीमध्ये चुकीची दुरुस्ती करता येणार, जुने फोटो बदलणे, पत्त्यामध्ये आणि नावामध्ये दुरुस्ती करणे, व मतदान केंद्राची सिमा निश्चित करता येणार आहे.तसेच १९ ऑगस्टपर्यंत सुनावणी होऊन हरकती दूर करता येणार आहे आणि २० ऑगस्टला मतदारांची अंतिम यादी प्रसिध्द होणार आहे. तरी धर्माबाद तालुक्यातील सर्व नविन मतदारांनी येत्या विधानसभा व स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीसाठी आपले नाव मतदार यादी मध्ये नोंदवण्याचे अवाहान मनसे शहराध्यक्ष सचिन रेड्डी यांनी केले आहे.

शहरातील विश्वसनीय बिग सुपर मार्केट

महावीर घर संसार



किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी

प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | अॅल्युमिनियमच्या वस्तू

घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही

सुमित 7620111118 राजेश जैन 7588348738

रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117

व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181

वितरण स्थितीसाठी 9021395308

घाऊक चौकशीसाठी 7620111118

www.mahavirbestprice.com

sumitparakh73@gmail.com

S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर

प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर

## शिवसेनेचे जिल्हाप्रमुख खांडेंना अटक

आधुनिक केसरी न्यूज

**बीड :** शिवसेना शिंदे गटाचे जिल्हाप्रमुख कुंडलिक खांडे यांची ऑडीओ क्लिप व्हायरल झाल्यानंतर जिल्ह्यात एकच गोंधळ उडाला. खांडे यांच्या विरोधात पंकजा मुंडे यांच्या समर्थकांकडून प्रचंड संताप व्यक्त केला जाऊ लागलाय. त्यात काल रात्री साडे बारा ते एकच्या सुमारास कुंडलिक खांडे यांना बीडच्या गुन्हे अन्वेषण विभागाच्या पोलिसांनी बीड-अहमदनगर रस्त्यावरील जामखेड या ठिकाणी ताब्यात घेतले. त्यांच्या विरोधात गेल्या चार महिन्यापूर्वी कलम 307 अंतर्गत गुन्हा दाखल झालेला होता. खांडेंच्या अटकेने बीडमध्ये खळबळ उडाली आहे. विशेष म्हणजे खांडे गेली चार महिने उघडपणे सर्वत्र फिरताना दिसून येत होते. दस्तुरखुद्द जिल्हा पोलीस अधिक्षकांच्या उपस्थितीतही ते अनेक ठिकाणी पहायला मिळत होते. लोकसभा निवडणुकीमध्ये आपण पहिल्यांदा पंकजा मुंडेंना धोका दिला. स्वतःच्या गावातून लीड दिली मात्र अन्य सातशे पेक्षा अधिक बुथची यंत्रणा पंकजांचे प्रतिस्पर्धी बजरंग सोनवणेंना दिली. एवढेच नव्हे तर निवडणुकीमध्ये सोनवणेंना पैसेही पुरवले. यासह कृषीमंत्री धनंजय मुंडे यांची गाडी फोडण्याबाबतचा संवाद असलेला ऑडीओही परवा व्हायरल झाला आणि जिल्ह्यामध्ये एकच खळबळ उडाली. पंकजा मुंडे समर्थकांनी संतप्त होत सोशल मिडियावर प्रतिक्रिया व्यक्त केल्या. तर याच प्रकरणी काल बीड आणि परळीमध्ये खांडेंवर गुन्हा दाखल झाला. मात्र रात्री साडेबारा वाजण्याच्या सुमारास कुंडलिक खांडे यांच्या विरोधात गेल्या चार महिन्यांपूर्वी दाखल असलेल्या कलम 307 अंतर्गत जामखेड येथून त्यांना अटक करण्यात आले. चार महिन्यांपासून कुंडलिक खांडे सर्वत्र फिरताना दिसून येत होते. नेत्यांच्या व्यासपीठावर, सभांमध्ये एवढेच नव्हे तर जिल्हा पोलीस अधिक्षकांसोबतही ते अनेक वेळा पहायला मिळाले. मात्र ऑडीओ क्लिप व्हायरल झाल्यानंतर कुंडलिक खांडेंना बीड पोलिसांनी अटक केली. अटकेनंतर खांडेंना पेठ बीड पोलिसांच्या स्वाधीन करण्यात आले असून आज त्यांना न्यायालयासमोर हजर करण्यात येणार आहे.